सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
शनिवार, २ ऑगस्ट २०२५




# ।। कर्मयोगी दीपस्तंभ ।।



## इवलेसे रोप लावियेले द्वारी, त्याचा वेलू गेला गगनावरी

इवलेसे रोप लावण्याची संकल्पना व मानसिकता तयार होणे हे सहज सोपे नाही. रोपण सगळेजण करतात, पण संवर्धन मात्र कमालीचे अवघड काम आहे. काही माणसं एका विशिष्ट ध्येयाने पेटलेले असतात. स्वतः जळून समाजाला प्रकाश देतात. शिक्षणाची गंगा समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचलं पाहिजे, हा उदात्त हेतू उराशी बाळगून सन १९५९ साली शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांनी शिक्षण प्रसारक मंडळ या शैक्षणिक रोपट्याचे लावण करून सातत्याने खतपाणी घातले म्हणून आज या रोपट्याचे विशाल वटवृक्षात रुपांतरीत झाल्याचे दिसून येत आहे.

शिक्षण हा मानवी जीवनातला एक मैलाचा दगड आहे. शिक्षणामुळेच माणसाला ज्ञान, कौशल्य आणि क्षमता प्राप्त होतात. परिणाम स्वरूप त्यांचे जीवन सुधारते आणि समाजाच्या विकासाला मदत होते . शिक्षणाचे महत्त्व अनमोल आहे कारण ते व्यक्तीला सक्षम आणि परिपूर्ण बनवते, हे गुरुजींनी जाणले होते. म्हणून सामाजिक परिवर्तन करायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. समाजातील श्रीमंत लोक शिकतील परंतु गरिबांचे काय? हा प्रश्न गुरुजींसमोर होता. चांगली शरीर यष्टी असताना फौजदार होण्याची संधी चालून आल्यानंतर सुद्धा गुरुजींनी शिक्षकी पेशा स्वीकारून 'दुरितांचे तिमिर जावो' हे ध्येय ठेवून समाजातील वंचित घटकाला ज्ञानरूपी प्रकाश देण्याचे काम त्यांनी सातत्याने करीत राहिले. याचे कारण त्यांना माहीत होते की, शिक्षणामुळे व्यक्तीचा बौद्धिक, सामाजिक व भावनिक विकास होतो. जीवनात प्रगती करता येते. शिक्षणामुळे समाजातील अंधश्रद्धा आणि गैरसमज देखील दूर होतात. शिक्षणामुळे चरित्र संपन्न व्यक्ती घडतो. शिक्षणाबरोबर समाज परिवर्तन हा प्रमुख उद्देश ठेवून अणदुर परिसरात शिक्षणाची गंगा प्रवाहित केले. अंधश्रद्धा व्यसनाधीनता काढून टाकण्याचे कार्य करीत असताना जीव धोक्यात घालून चिवरीच्या यात्रेत होत असलेल्या अमानुष प्राणी हत्या थांबविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

खंडोबाचे मंदिर सर्वांसाठी, सर्व धर्मीयांसाठी खुले केले. कारण सर्व धर्म समतेची भावना समाजात निर्माण करणे हे शिक्षणाचे व शिक्षकांचे कर्तव्य आहे हे त्यांनी जाणले होते. गुरुजींना वाटायचे शिक्षणाचे महत्त्व केवळ व्यक्तीसाठीच नाही तर संपूर्ण समाजासाठीच आहे. शिक्षणामुळे एक सुशिक्षित आणि सक्षम समाज निर्माण होतो. जो देशाच्या विकासासाठी महत्त्वाचा असतो. शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा भविष्य व देशाचा सुजाण नागरिक आहे. असा सक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी गुरुजींनी जवाहर विद्यालयात शिस्त लावली. योग्य संस्काराची पेरणी करून 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे, 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो', 'माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे' ही भावना विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविले. थोर महापुरुषांची जयंती, पुण्यतिथीच्या माध्यमातून त्यांचे आदर्श विद्यार्थ्यांच्या समोर ठेवून, विविध विद्वानांचे मार्गदर्शन व प्रबोधनाचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे जीवन घडविले. शिक्षण हे केवळ नोकरी रोजगार मिळविण्यासाठीच नाही तर चारित्र्यसंपन्न माणूस घडविण्याचे साधन आहे. माणसाला माणूस म्हणून खरी ओळख शिक्षणातूनच मिळते. शिक्षणामुळे मानवी नीती मूल्यांचा वारसा मिळतो. गुरुजींनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या परिवर्तनासाठी खूप मोठी शिदोरी दिलेली आहे.

ग्रामीण भागातला विध्यार्थी महाराष्ट्रात प्रथम येऊ शकतो, हे सचिन हराळकर च्या माध्यमातून सिद्ध करून दाखविलेला आहे. ग्रामीण भागातला विद्यार्थी अनंत अडचणींवर मात करून आकाशात गरुड झेप घेऊ शकतो हा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे महतकार्य गुरुजींनी करून जवाहर विद्यालयाचे आदर्श महाराष्ट्र समोर ठेवलेला आहे. अणदुर येथे बाल मंदिरापासून ते जवाहर विद्यालय, जवाहर उच्च माध्यमिक विद्यालय आणि जवाहर महाविद्यालय हे उच्च शिक्षणाचे शिखर पदाकांत करीत आज जवाहर महाविद्यालयात पदवी पदव्युत्तर शिक्षण व संशोधन क्षेत्रात काम करणारे अनेक विद्यार्थी उंच भरारी घेत आहेत.

शिक्षणाची गंगा तुळजापूर तालुक्यातील पंचक्रोशीत अखंड वाहत आहे. गरीब होतकरू विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची सोय व विशेष म्हणजे मुलींच्या समोर असलेली उच्च शिक्षणाची समस्या त्यांच्यामुळे सुटू शकली. आज ग्रामीण भागातल्या मुली पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात, संशोधन क्षेत्रात उत्साहाने काम करीत आहेत.

२ ऑक्टोबर १९९१ साली गुरुजींनी जवाहर महाविद्यालय सुरू केले बी. ए., बी. कॉम. व बी. एससी. हे तिन्ही पदवीचे वर्ग सुरू केल्यामुळे आज हजारो विद्यार्थी या महाविद्यालयातून पदवी घेऊन संपूर्ण देशातच नव्हे तर परदेशातही कार्यरत आहेत. गुरुजींची इच्छा होती की, या ठिकाणी पदव्युत्तर वर्ग सुरू करावे तर त्यांच्या पश्चात संस्थांचालक, प्राचार्य व प्राध्यापकांच्या सहकार्याने एम. एस्सी. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व एम. कॉम. हे पदव्युत्तर वर्ग जून २०२२ पासून महाराष्ट्र शासनाची व विद्यापीठाची मान्यता घेऊन सुरू करण्यात आले. आज धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी पदवीव्युत्तर विभागात प्रवेश घेऊन ज्ञानार्जन करीत आहेत. ग्रामीण भागात अनेक समस्या आहेत, या समस्यावर मात करून शेतकरी, शेतमजूर, गरीब, होतकरू विद्यार्थी याचा लाभ घेऊन आपल्या उच्च शिक्षणाचे अधुरे स्वप्न पूर्ण करीत आहेत.

**जवाहर संशोधन केंद्र**

जवाहर महाविद्यालय, अणदुर येथे पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर संशोधन कोठे करावे? हा प्रश्न होता. तेव्हा रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र या विषयात पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून संशोधन केंद्रास मान्यता घेऊन आज जवाहर महाविद्यालयात संशोधन केंद्र ही सुरू आहे. संशोधन केंद्रास मान्यता मिळवण्यासाठी विद्यापीठाच्या अनेक अटी होत्या. त्या अटी संस्थांचालकांच्या मार्गदर्शन व सहकार्याने पूर्ण करून जानेवारी २०२३ पासून संशोधन केंद्राची मान्यता घेण्यात आली . ग्रामीण भागातील विद्यार्थी रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र विषयात संशोधन करून पीएचडी पदवी घेत आहेत. महाविद्यालयातील १६ प्राध्यापक हे संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत.

**जवाहर करिअर ॲकॅडमी**


ग्रामीण भागातील विद्यार्थी पदवीनंतर परिस्थिती नसताना शहरात जाऊन पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रात व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात भरमसाठ फी भरून प्रशिक्षण घेतात. ज्यांना शक्य आहे ते जातात. परंतु ज्यांची आर्थिक परिस्थिती नाही त्यांनी काय करावे? इच्छा असूनही त्यांना संधी मिळत नाही. याची गरज ओळखून संस्थेचे सचिव रामचंद्र दादा आलूरे, प्रा. भालचंद्र बिराजदार व एडवोकेट लक्ष्मीकांत पाटील साहेब यांच्या निदर्शनास ही गोष्ट आणून दिल्यानंतर या शैक्षणिक वर्षापासून भरतीपूर्व व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र शिवाय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ब क व ड श्रेणीतील सर्व परीक्षांचे मार्गदर्शन या ठिकाणी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना करून द्यावे, या हेतूने जवाहर करिअर अकॅडमी ची सुरुवात केली.

या अंतर्गत पोलीस, पॅरामिलिटरी फोर्सेस, तलाठी, ग्रामसेवक, बँक आदी क्षेत्रात काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी म्हणून त्यांना मार्गदर्शन व शारीरिक सराव याचे प्रशिक्षण विद्यार्थी घेत आहेत. आज या महाविद्यालयात जवळपास १२०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि आपल्या उज्वल भविष्यासाठी प्रयत्न करीत आहेत. जर गुरुजींनी या ठिकाणी उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली नसती तर आज यापैकी अनेक विद्यार्थी आपले शिक्षण अर्धवट सोडून राहिले असते असेच वाटते. गुरुजी, तुम्ही लावलेल्या या रोपट्याचे विशाल अशा वटवृक्षात रूपांतर झालेले विस्तारित रूप पाहायला तुम्ही हवे होता. ही खंत मात्र आम्हाला पदोपदी सतावते. या निमित्त गुरुजींच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन...!



**- प्रो. डॉ. उमाकांत चनशेट्टी प्राचार्य, जवाहर महाविद्यालय, अणदूर.**

---



शिक्षणमहर्षी

**कै. सि.ना.आलूरे गुरुजी**

यांना चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त शतः शतः नमन..!

✼ अभिवादक ✼

**इंडो फर्निचर**

स्टेट बँक, बाळीवेस, सोलापूर ४१३००२

**स्वप्नील वडजे   संजय वडजे**

मो. ९४२२०६७२३१

---



आमचे श्रध्दास्थान, संतश्रेष्ठ

**कै. सि.ना.आलूरे गुरुजी**

यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन..!



अभिवादक

**मा.श्री.सुरेश ठोंबरे**

माजी मुख्याध्यापक

जवाहर विद्यालय, अणदूर

**समस्त ठोंबरे परिवार, बारुळ**

---



कर्मयोगी, शिक्षणमहर्षी, मराठवाड्याचे प्रती साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, तुळजापूर तालुक्याचे माजी आमदार

**कै. सिद्रामप्पा आलुरे गुरुजी**

यांना चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन..!

✼ अभिवादक ✼

**जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**

अणदूर, ता.तुळजापूर

**मा.भारत कस्तुरे** – अध्यक्ष शि.प्र.मं. अणदूर

**मा.रामचंद्र आलुरे** – अध्यक्ष, जवाहर महाविद्यालय विकास समिती

**डॉ.उमाकांत चनशेट्टी** – प्राचार्य तथा सचिव जवाहर महाविद्यालय विकास समिती

**प्रा.भालचंद्र बिराजदार** – सदस्य, जवाहर महाविद्यालय विकास समिती

**ॲड.लक्ष्मीकांत पाटील** – सदस्य, जवाहर महाविद्यालय विकास समिती

**सदस्य जवाहर महाविद्यालय विकास समिती व सर्व प्राध्यापक विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी**

---



आमचे श्रध्दास्थान..!!

**स्वर्गीय सि.ना.आलुरे गुरुजी**

यांना तृतीय पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन..!

अभिवादक

**शिक्षणमहर्षी सि.ना.आलुरे गुरुजी सेवकांची सह.पतसंस्था मर्या,अणदूर**

| आर.एस.ठोंबरे | अनिता मुदकण्णा | मकरंद पाटील | किरण गायकवाड |
| --- | --- | --- | --- |
| चेअरमन | व्हा. चेअरमन | सचिव | उपसचिव |

संचालक : जयंत जाधव, गफार शेख, सुभाष माशाळकर, गोपाळ कुलकर्णी, विश्वनाथ कलशेट्टी, बाळू बागडे, अनिल गुरव, भिभीषण नवगिरे, श्रीमती, सुरेखा कबाडे
लिपीक : राजेंद्र सुरवसे, सेल्समन : सचिन शा.आलुरे व सर्व सभासद व कर्मचारी

---



प्रेरणास्त्रोत

**कै. सि.ना.आलूरे गुरुजी**

यांना चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन..!

अभिवादक

दुतितांचे तिमिर जावो!

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर संचलित,
जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
व एम सी व्ही सी विभाग अणदूर, ता.तुळजापूर

**कुलकर्णी गो.बा.** प्राचार्य

**सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी**

---



आमचे दैवत, प्रेरणास्त्रोत,

**कै. सि.ना.आलुरे गुरुजी**

यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या स्मृतीस

कोटी कोटी अभिवादन..!

✼ अभिवादक ✼

**श्री कुलस्वामिनी उच्च माध्य. विद्यालय, तुळजापूर**

**श्री कुलस्वामिनी विद्यालय, तुळजापूर**

**श्री.ठोंबरे राजकुमार शिवाजी** (मुख्याध्यापक)

श्रीमती.हराळकर सु.ज. (स.शि.)
श्री.कोठावळे सं.बा (स.शि.)

| | | |
| --- | --- | --- |
| श्री.कबाडे सं.भा. (स.शि.) | श्री. कबाडे सि.दे. (स.शि.) | श्री.राऊत ध.शि. (स.शि.) |
| श्री.बिराजदार ग.म. (स.शि.) | श्री.सोमवंशी अ.ज. (स.शि.) | श्री. कोणे बा.तु. (स.शि.) |
| श्री.कोळेकर ध.शा. (स.शि.) | श्री.गवळी श.धों. (स.शि.) | श्री.जाधव र.ह. (स.शि.) |
| श्री.गुरव शि.ह. (स.शि.) | श्री.भालेराव दि.द. (स.शि.) | श्री.राउत द.का. (स.शि.) |
| श्री.बंडगर प्र.अ. (स.शि.) | श्री.धोत्रे अ.दे. (स.शि.) | श्री.ससाणे रा.रा. (स.शि.) |
| श्री.कांबळे बा.म. (स.शि.) | श्री.गुरव बा.कि.(स.शि.) | श्री.सिध्दमल्ले जी.व्ही.(क.लिपीक) |
| श्री.कंदले अ.उ. (स.शि.) | श्री.बिराजदार प्र.अ. (स.शि.) | श्री.लाटे रा.का. (सेवक) |
| श्री.वागज ग.द. (स.शि.) | श्रीमती.कासार वै.मो. (स.शि.) | श्री.कुलकर्णी रा.दे..(सेवक) |
| श्री.पोतदार वा.पा. (प्रयोगशाळा सहाय्यक) | श्रीमती मैंदर्गी स.शां. (स.शि.) | श्री.सय्यद व.अ (सेवक) |
| | | श्री.शिंदे आ.णे (सेवक) |



# ।। कर्मयोगी दीपस्तंभ ।।



## स्व. आलूरे गुरुजींच्या त्यागमय प्रवासामुळेच, सात समुद्रापलीकडेही सुगंध दरवळतोय...



गुरुजींची वाटचाल म्हणजे अंगावर शहारे आणणारी किंबहुना अचंबित.. खरे तर नभूतोच म्हणणे औचित्याचे ठरेल. सत्तर वर्षांपूर्वी स्वतःची सरकारी नोकरीला लाथ मारून गोरगरीब, मागास, वंचित वर्गातील मुला बाळांचा आभाळ होऊ नये अर्थात शिक्षणापासून दूर राहू नये व परके होऊ नये म्हणून शिक्षणाची गंगा गरिबातल्या गरीब घराण्याच्या अंगणापर्यंत जावी. आपले घर उघडे पडले तरी चालेल मात्र परक्याच्या घरावर छत दिसले पाहिजे. या उदात्त हेतूने प्रेरित होऊन स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून प्रचंड अडचणी.. हालकीच्या काळात संस्थेची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेऊन त्याचे वटवृक्षात रूपांतर करण्याची किनिया गुरुजींनी केली. या दाहकतेत स्वर्गीय शांता काकी यांचे योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे हे नाकारता येत नाही. सध्याच्या निव्वळ पैशासाठी वाटचाल करणाऱ्या शिक्षण सम्राटाच्या डोळ्यात अंजन घालणारे ठरेल एवढे मात्र निश्चित.

गुरुजींच्या या उदात्त व प्रेरणादायी योगदानातूनच आज असंख्य ,अगणित विद्यार्थी विविध क्षेत्रात पाया रोऊन आहेत हे मला अभिमानाने लिहावे असे वाटते. गुरुजीनी जर शिक्षणाची गंगा ग्रामीण भागात उभारले नसते तर कदाचित मी पत्रकार झालो नसतो. एवढेच नव्हे तर हजारो कुटुंबाचे शिक्षणाचे उद्देश दुरापास्त झाले असते हेही मुद्दाम सांगावस वाटते. या संस्थेअंतर्गत शेकडो कुटुंबाचे उदरनिर्वाह, तालुक्यातील व्यवसायाला भरभराटीला ब्रेक लागला असता.

गुरुजींनी निव्वळ शिक्षणाची कासच धरले असे नाही तर सहकार क्षेत्रात प्रवेश करून तुळजाभवानी साखर कारखान्याच्या निर्मितीतून शेतकरी कामगारांना नव संजीवनी दिली. शेतकऱ्यांचे हक्काचे व्यासपीठ निर्माण करण्यात खऱ्या अर्थाने गुरुजींचा सिंहाचा वाटा आहे. मात्र सहकाऱ्यांच्या स्वहित धोरणामुळे गुरुजींना संस्थापक अध्यक्ष असतानाही दूर लोटण्याचे काम झाले हा सहकार क्षेत्रातील इतिहास नजरेआड करून चालणार नाही. अखेर सहकार क्षेत्र मोडीत निघतोय हे लक्षात आल्यानंतर पुनश्च राम-लक्ष्मण जोडीची हाक शेतकऱ्याने दिली. अन् नव्हत्याचे होते झाल्यानंतर निसर्गाची अवकृपा, सहकाऱ्यांचे असहकार धोरण व काम गारांचे धर. सोड वृत्तीमुळे तालुक्याचा विकासाचा कणा मोडकळीस आला याची खंत नेहमी गुरुजी समाज माध्यम ासमोर बोलून दाखवत. संस्था.. कर्मचारी.. विद्यार्थी यांची सांगड घालता घालता संपूर्ण आयुष्य गुरुजींनी व्यतीत केले हा इतिहास सर्वसामान्य जनता कदापिही विसरू शकनार नाही. संस्थेच्या वाटचालीपासून गुरुजींचे विशेष. शांता काकीचे योगदान न भूतोच म्हणावे लागेल. त्याकाळी केवळ संस्थेच्या जीवावर वस्तीग्रह चालवणे अशक्यच..

मात्र ते गुरुजींनी शक्य करून दाखवाण्याची किमया खरोखरच प्रेरणादायी व आदर्शवतच म्हणावे लागेल. डबघाईला आलेला वस्तीग्रह व विद्यार्थ्यांचे होणारी उपासमार ची वेदना जेव्हा शांता काकूंना कळली तेव्हा या आदर्श माऊलीने कशाची ही परवा न करता अंगावरील संपूर्ण दागिने अलंकार गहाण ठेवले एवढेच नव्हे तर ते विकून विद्यार्थ्यांची भूक भागवली हा इतिहास शब्दाच्या पलीकडचा आहे. केल्याने होत आहे रे ते केलेच पाहिजे हा गुरुजींचा मूळ मंत्र होता हे विसरता येणार नाही. जर गुरुजींनी संस्थेची निर्मिती करताना स्व.हित पाहिले असते तर आज हा परिवार कोट्यावधीतच नाही तर अब्जाधीशा पलीकडे गेलेला पहावयास मिळाला असता. राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात एकमेव संस्था असून जिथे नोकरीसाठी व शिक्षणाला विद्यार्थ्यांना व पालकांना कडून दमडा ही घेतला जात नाही हा गुरुजींचा विचारांचा वारसा व इतिहास असंभवच म्हणावा लागेल.

आज या संस्थांतर्गत अनेक शाळा, वस्तीग्रह, जवाहर महाविद्यालय, पदवी पदव्युत्तर शिक्षणाने संपूर्ण तालुक्यात विस्तारलेल्या आहे. ६७ वर्षांपूर्वीची व आजची शैक्षणिक तुलना केल्यास जमीन .आसमानचा फरक पहावयास मि ळेल. आज हजारो विद्यार्थी गुरुजींनी दिलेल्या संस्काराच्य जोरावर फळ चाखताना दिसताहेत.

भावी येणारा काळ संघर्षाचा व स्पर्धेचा असून संस्था चालका बरोबरच कर्मचाऱ्यांनी गुरुजींच्या हा आदर्श न विसरता त्याच हिमतीने, उमेदीने व जिद्दीने संस्थेच्या नावलौकिकात त्यागाने पुढे आले पाहिजे. सध्याचा हा काळा संस्था चालवण्यापुरता सोपा नाही. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी. गुणवत्तेसाठी सामूहिक जबाबदारीची खऱ्या अर्थाने गरज आहे हीच गुरुजींना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.

माझ्या जीवनातील प्रसंग मी कदापी विसरू शकणार नाही, २४ वर्षांपूर्वी माझ्या लग्नाचा साखरपुडा होता, त्यावेळी जवळगा जे तालुका आळंद येथील भालचंद्र मुलगे सावकार संपूर्ण कुटुंबासह चंद्रकांत करपे यांच्या वाड्यात बैठक आयोजित होती. या बैठकीत आदरणीय गुरुजी, शांता काकी, स्व.अण्णाराव काका मुळे, स्व.चंद्रकांत अण्णा धमुरे बैठकीस उपस्थित होते. बैठकीपूर्वीच गुरुजींनी माझे सासरे मुलगे सावकार यांना खडे बोल सुनावले, हा फक्त मुलगाच आहे, नोकरी नाही, शेती नाही फक्त मुलगा धडपड्या असल्याचे सांगून पुढे बोला असे सुनावले, स्वर्गीय धमुरे अण्णांच्या पाठबळामुळे होकार मिळाला. त्याच क्षणी गुरुजींनी फक्त मुलगी आणि नारळ देण्याचे सांगून सुपारी फोडण्याचे सांगितले, हा अविस्मरणीय क्षनाणे माझ्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक झाले हे मात्र मी कदापी विसरू शकत नाही. अशीअसंख्य प्रसंग माझ्या बरोबरच इतरांच्या जीवनात आले हे मी मान्यच करतो...



**- चंद्रकांत हगलगुंडे,**
**पत्रकार. अणदूर.**

## गुरुजी खरंच तुम्ही महान होतात

बुद्धीचा महासागर तुम्हीच होता कायद्याचे
आगार तुम्हीच होता तळपणारा सूर्य तुम्ही होता
लोखंडावर प्रहारणारा घन तुम्हीच होता
गुरुजी तुम्ही खरंच महान होतात!

तळाचा वेध घेणारा शार्क तुम्ही होता
डरकाळी फोडणारा ढाण्या वाघ तुम्हीच होता
समतेचा नंदादीप तुम्हीच होता
दुबळ्यांच्या काठीचा आधार तुम्हीच होता
गुरुजी खरचं तुम्ही महान होतात!
माणुसकीचा खळखळणारा जिवंत झरा तुम्हीच होता
उपेक्षित वंचिताच्या काठीचा आधार तुम्हीच होता
भुकेल्यांना अन्न ,तहानलेल्यांना पाणी पाजणारे
तुम्हीच होता
मायेचा फुटणारा पाझर तुम्हीच होता
गुरुजी खरंच तुम्ही महान होता !
राजकारणाच्या रांगेतला तत्त्वज्ञानी आणि मुत्सद्दी
तुम्ही होता, शिक्षणप्रेमीच्या गळ्यातला कंठमणी
तुम्हीच होता, हजारो निराधार लेकरांची माय तुम्ही
होता
अनेकांचे संसार उभे करणारे कर्मयोगी तुम्हीच होता
गुरुजी खरंच तुम्ही महान होतात!
रंजल्या गांजल्यांचा देव तुम्ही होता
अंधाराला छेदणारा खरा प्रकाश तुम्ही होता
महाराष्ट्रातले खरे शिक्षण महर्षी अन् मराठवाड्याचे
साने गुरुजी तुम्हीच होता
गुरुजी खरंच तुम्ही महान होता!
अंधश्रद्धेची झाडलोट करणारे संत गाडगेबाबा
तुम्हीच होता
स्वदेशेची शिकवण देणारे खरे बापू तुम्हीच होता
बाबा आमटे, विनोबांचे खरे वारसदार तुम्ही होता
फुले ,शाहू ,आंबेडकर चळवळीतला बळ देणारे
तुम्हीच होता
गुरुजी खरच तुम्ही महान होता!
समतेची शिकवण देणारे महात्मा बसवेश्वर तुम्ही
होता
शिक्षणाचे महत्त्व सांगणारे खरे जोतिबा तुम्ही होता
शिस्त आणि सत्याची शिकवण देणारे तुम्ही होता
सहकार क्षेत्रातील दीपस्तंभ तुम्हीच होता !
गुरुजी खरच तुम्ही महान होता !
गरीबाच्या अंगणापर्यंत ज्ञानाची गंगा घेऊन जाणारे
तुम्हीच होतात
हजारो विद्यार्थ्यांना माणूस म्हणून उभे करणारे
तुम्हीच होता
अनेकांची इच्छापूर्ती करणारी कामधेनु तुम्हीच
होता
अणदूरची ख्याती सातासमुद्रापलीकडे नेणारे तुम्हीच
होता गुरुजी खरच तुम्ही महान होतात!
अनेक मायमाऊल्यांच्या कपाळाचा कुंकू वाचवणारे
तुम्ही होता
राजकारणातील परिवर्तनाची नांदी तुम्ही होता
अनेक भगिनींना संरक्षण देणारा खरा भाऊ तुम्ही
होता
ओवाळणी देऊन जगण्याचे सामर्थ्य निर्माण करणारे
तुम्हीच होता
गुरुजी खरंच तुम्ही महान होता!
मायेची ममतेची सावली तुम्ही होता
अनिष्ट रूढी परंपरेवर आसूड ओढणारे तुम्ही होता
ढोंगी व दांभिकतेवर कडाडणारा तुमचा आवाज
होता
तुळजापूर तालुक्याचे भाग्यविधाते तुम्हीच होता
गुरुजी खरंच तुम्ही महान होता !
आमची शिस्त, ताकत, आवाज, श्वास तुम्ही होता
अनेकांच्या आयुष्यातला खरा परीस तुम्हीच होता



काकीच्या अंगावरील दागिने
विकून गोरगरिबांच्या मुलांना
पोसणारे तुम्हीच होता
गुरुजी खरचं तुम्ही महान
होता! आमचे पोलीस
ठाणे ,कोर्ट आमचे
न्यायाधीश तुम्हीच होता,
चुकणाऱ्यासाठी तुम्ही
पोलीस कोठडी अन झेल
होता सर्वधर्म समभावाची शिकवण देणारा महात्मा
तुम्ही होता, आमच्या खऱ्या संस्काराचे विद्यापीठ
तुम्हीच होता !**गुरुजी तुम्ही खरंच महान होतात!**

**- दयानंद काळुंके,**
**पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते अणदूर**

## जगण्याची उभारी आदरणीय आलुरे गुरूजी

**आलुरे बाबा शब्दचं तसा भारी,**
**आदर्श व्यक्तीमत्व वर्णन करावयास**
**शब्द पडतील अपुरे**
**अवर्णनीय आपला जीवन प्रवास**
**व्यक्त होण्यास शब्द कमी पडे**
**साधी राहणी उच्च विचारसरणी**
**नामांकित संस्थेची बाबा तुम्ही केलात पायाभरणी...**
**गोरगरिबांपर्यंत शिक्षण हा एकच ध्यास,**
**केवळ शैक्षणिकच नव्हे तर केलात सामाजिकही विकास,**
**साने गुरुजी आपण मराठवाड्याचे,**
**आदर्श लहान थोरांचे...**
**कर्तबगारी स्मरुनी तुमची, सर्वांनीच पाऊल उचलायचे,**
**आता एकच आस मनी बाळगुणी,**
**स्वप्न तुमचे साकारायचे,**
**गोरगरीब, दीन दुबळ्यांना सर्वधर्म समभाव मानुनी,**
**भविष्य तयांचे उज्ज्वल करायचे**
**सकल आयुष्य ग्रामीण भागातील सामाजिक व**
**शैक्षणिक परिवर्तनासाठी केले समर्पित,**
**समाजात एक नवा विचार, नवा संस्कार रुजवित**
**तळागाळातील ही जनता त्यांच्या विचारधारेने प्रेरित,**
**कित्येक पिढ्यानं पिढ्या होत गेल्या संस्कारित,**
**समाजासाठी जगले, शिक्षणासाठी लढले,**
**संस्कारासाठी झगडले, शैक्षणिक माध्यमातून खेड्यात**
**नवचैतन्य त्यांनी फुंकले,**
**अनमोल कार्याच्या प्रकाशाने ग्रामीण महाराष्ट्रात अनेक**
**खेड्यांचे दीप बाबांनीच उजळले...**
**सहवास जरी लाभला नसला तरी,**
**कीर्ती तुमची दुरवर पसरलेली,**
**विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देत,**
**आम्हांलाही द्यायची आहे**
**त्यांच्या जीवनाला उंच भरारी...**

**- श्रीमती शेळके एस.एस.** सहशिक्षिका, जवाहर विद्यालय अणदूर

## शिस्तबद्ध आदर्श शिक्षक : आलुरे गुरुजी

जन्म आणि मृत्यू हे प्रत्येक माणसाला असते जन्माला आलेला प्रत्येक माणूस कधी ना कधी हा देह सोडून परलोकी जाणार हे निश्चित आहे पण जन्म आणि मृत्यू याच्या मधल जे अंतर आहे ज्याला आपण जीवन म्हणतो ते मात्र प्रत्येकाला वेगवेगळ् मिळत असत आपल्याला मि ळालेल्या या सुंदर जीवनाचा उपयोग आपण कशा पद्धतीने करतो यावर सारं काही अवलंबून असतं.

स्वतःसाठी तर प्रत्येक जण जगत असतो परंतु आपल्या जगण्यातून दुसऱ्याला आणि दुसऱ्याच्या कुटुंबाला सुखी आणि आनंदी करण्याचं भाग्य हे फार कमी लोकांच्या नशिबी मिळतं याच मालिकेमधलं मराठवाड्यातले प्रति साने गुरुजी म्हणून समजले जाणारे शिक्षण महर्षी आदरणीय सि. ना.आलुरे गुरुजी.. अणदूर सारख्या ग्रामीण भागामध्ये जन्मून सुद्धा स्वकर्तृत्वाने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत आलूरे गुरुजी यांनी स्वतः चे अस्तित्व तयार केलं क्षेत्र कुठले का असेना त्या क्षेत्रामध्ये तुम्ही जर प्रामाणिकपणाने काम केलं तर तुम्हाला त्यात यश मिळतं याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे आलूरे गुरुजी शिक्षण, राजकारण ,सामाजिक कारण, आर्थिक आणि सांस्कृतिक या प्रत्येक क्षेत्रामध्ये आलुरे गुरुजी यांचं कार्य हे कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

जवाहर विद्यालय अणदूर च्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरीब मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण, उच्च दर्जाचे संस्कार आणि त्याच प्रमाणे माणूस म्हणून जगायला शिकवणारे शिक्षण हे गुरुजींनी सर्वांना दिलं. जवाहर विद्यालय ही फक्त शाळा नाही तर जवाहर विद्यालय म्हणजे संस्कारच चालतं बोलतं विद्यापीठ आहे लाखो गरीब मुलांना स्वतःच्या पायावर उभं करण्याचं काम हे आलुरे गुरुजींनी जवाहर विद्यालयाच्या माध्यमातून आजपर्यंत केलेल आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि तो पिल्यावर प्रत्येक माणूस गुरगुरणार हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला सांगितलं त्यामुळे ज्या क्षेत्रांमध्ये पीक सुद्धा पिकायचं नाही वाळवंटाचं मराठवाडा आणि त्यातल्या त्यात हे आमचं तुळजापूर तालुका हे धोंड्या कुसळ्याचा तालुका म्हणून समजलं जायचं इथं पाणी नव्हतं रस्ते नव्हते शाळा नव्हत्या महाविद्यालय नव्हतं अशा क्षेत्रांमध्ये आदरणीय आलूरे गुरजी व आदरणीय मधुकरराव चव्हाण साहेब,आदरणीय नरेंद्रजी बोरगावकर, आदरणीय शिवाजीराव पाटील बाभळगावकर या सर्व तालुक्यातल्या नेत्यांनी मिळून या तालुक्याला एक वेगळे नंदनवनाचे स्वरूप देण्यात फार मोठी भूमिका आहे राजकारण करत असताना त्याचा वापर समाजकारणासाठी कसा करावा राजकारणाच्या माध्यमातून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात बदल कसे करावेतआलूरे गुरुजी यांनी संपूर्ण महाराष्ट्रापुढे एक नवा आदर्श निर्माण करून दिला आहे..

खरंतर अजून गुरुजी यांची राहणीमान त्यांचं वागणं त्यांचं बोलणं हे प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी एक आदर्श होते,नव राजकारणासाठी एक आदर्श असं होतं साधी राहणीमान आणि उच्च विचार हे महात्मा गांधी यांनी घालून दिलेलं एकजीव संस्कार आहेत त्या संस्कारामध्ये आलूरे गुरुजींनी संपूर्ण हयात भर काम केलं.. अतिशय प्रेमळ आणि वेळ पडल्यानंतर तितकेच कठोर अशी गुरुजींचा स्वभाव होता तत्त्वाशी कधीही तडजोड केली नाही तत्त्वापासून कधीही वापस फिरले नाहीत..

गुरुजींचं हा देह सोडून जाताना वय वर्ष ९० होते.. परंतु त्यांची स्मरणशक्ती ही अतिशय तलक होती त्यांना पन्नास वर्षांपूर्वी साठ वर्षांपूर्वीच्या सगळ्या गोष्टी जशास तशा लक्षात राहायच्या प्रत्येक गावाम धला प्रत्येक माणूस त्याच्या कुटुंबातील व्यक्ती या प्रत्येकासोबत आलेली गुरुजींचं एक भावनिक प्रेमळ असं नातं होतं.. नातं जोपासताना ते किती सुंदर पद्धतीने जोपायचे की भेटल्यानंतर प्रत्येकाला घरातले कसे आहेत आई-वडील कसे आहेत मुलं बाळ कसे आहेत हे इतके आपुलकीने चौकशी करायचे की गुरुजींशी बोलताना आपण आपल्या वडिलांची किंवा आपण आपल्या वडीलधाऱ्यांशी बोलतोय अशी प्रत्येक वेळेस जाणीव व्हायची गुरुजी समोर असले की एक आदर्श युक्त दरारा हा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आणि कार्यकर्त्यांच्या मनामध्ये असायचा एक अतिशय नम्र शांत सुशभावी सुसंस्कारित असे व्यक्तिमत्त्व म्हणजे आलुरे गुरुजी..एखाद्या विषयावर परखड मत व्यक्त करताना समोरच्याला कसे वाटेल याचा विचार न करता जे सत्य आहे त्या सत्याच्या बाजूने बोलण्याच धाडस करण्याच सामर्थ्य गुरुजींच्या अंगी होतं म्हणून आलूरे गुरुजींच्या समोर जाताना त्यांच्यासमोर उभे राहताना प्रत्येकाच्या मनाम ध्ये एक नितांत आदर असायचा.. मलाही गुरुजींच्या सान्निध्यात काही काळ राहण्याचा लाभ मिळाला गुरुजींच्या आशीर्वादाने आणि गुरुजींच्या मार्गदर्शनाने मला माझ्या आयुष्यामध्ये मोलाचे सहकार्य त्यांचं लाभलं त्यामुळे कुटुंब वात्सल्य असं व्यक्तिमत्व आलूरे गुरुजी यांच्या पुण्य स्मरण दिना निमित्त माझ्या अहंकारी कुटुंबीयांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.



**- विनायक अहंकारी, माजी नगरसेवक**



**जुन्या स्मृतीस उजाळा : आलुरे गुरुजी जवाहर कॉलेज मधील एका कार्यक्रमात दीपपप्रज्वलन करताना.**



**जुन्या स्मृतीस उजाळा : आलुरे गुरुजी यांच्या समवेत प्रो.डॉ.अनिता मुदकण्णा**



**जुन्या स्मृतीस उजाळा : आलुरे गुरुजी व शांता काकी यांच्या समवेत डॉ.कांचन जतकर**

## स्व. आलूरे गुरुजी व सोलापूर तरुण भारतचे एक अनोखे नाते

आज स्व. गुरुजींचा स्मृती दिन या दिनाचे औचित्य साधून सोलापूर तरुण भारत त्यांच्या जीवन कार्यावर आधारित एक सुंदर, दर्जेदार, संग्रही ठेवण्यासारखी पुरवणी प्रकाशित करीत आहे, गुरुजींचे कार्य हे चिरंतन राहावे, येणाऱ्या पिढीसाठी ते प्रेरणादायी असावे आजच्या दिनी त्यांच्या आठवणींना उजाळा मिळावा त्यांच्या पवित्र स्मृतील विनम्र अभिवादन करावे हाच उद्देश मनी बाळगून आम्ही ही दर्जेदार पुरवणी अणदूर परिसरातील जनतेला देण्याचा प्रयत्न करीत आहोत,मराठवाड्याचे प्रति साने गुरुजी, ज्यांनी तुळजापूर तालुक्यात शिक्षणाची गंगा गोरगरीब, सामान्य जनतेच्या दरवाज्यापर्यंत नेली व त्या कुटुंबातील सदस्य शिकून मोठमोठ्या नोकऱ्यात लागली, अशा या तपस्वी, शिक्षण महर्षी, ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचे स्व. आलूरे गुरुजी यांचे व दैनिक सोलापूर तरुण भारत चे एक आगळे वेगळे नाते गुरुजी तरुण भारत मोठ्या आवडीने वाचत आपल्या प्रतिक्रिया देत तरुण भारत तत्कालीन सर्व संपादकांसोबत त्यांचा संवाद असायचा तरुण भारत च्या वर्धापन दिनाला त्यांच्या शुभेच्छा असायच्या तरुण भारत ने पण गुरुजींच्या पवित्र शैक्षणिक कार्याला सतत पाठिंबा दिला त्यांच्या ७५ च्या कार्यक्रमाला सप्तरंगी पुरवणी तरुण भारत नेच काढली होती, गुरुजी हे शिक्षण महर्षी होते त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडवले त्या काळात मुलींना शिक्षणासाठी बाहेरगावी पाठवत नसत पण गुरुजी स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते त्यांनी मुलींचे अनेक हॉस्टेल काढली त्या मध्ये हजारो मुली चांगले, दर्जेदार शिक्षण घ्यायच्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या त्या काळी शेतकऱ्याकडे पैसे नसायचे तेव्हा गुरुजींनी ज्वारी, गहू घेऊन हॉस्टेल मध्ये मुलींना, मुलांना प्रवेश देऊन त्यांचे शिक्षण पूर्ण केले, अणदूर गाव हे शिक्षणाची राजधानी असून येथील गुरुजींचे जवाहर विद्यालय हे शिक्षणाचे फार मोठे हब आहे अणदूर हे दोन गोष्टीने ओळखले जाते एक ग्रामदैवत श्री खंडोबाचे मंदिर व गुरुजींची शाळा जवाहर विद्यालय त्या मुळे अणदूर ला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे .गुरुजींच्या आठवणी जागृत, चिरंतन राहण्यासाठी गुरुजींचे भव्य, दिव्य स्मारक जवाहर कॉलेज च्या प्रांगणात उभे रहात आहे त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होवो, या पवित्र कार्यासाठी लोकांनी पुढे येण्याची गरज आहे अनेक दानशूर, कर्मचारी यांनी या कामी मोठ्या प्रमाणात मदत दिली आहे पण हे काम खूप मोठे आहे त्या मुळे गुरुजी मुळे आपल्या आयुष्याचे कल्याण झालेल्या सर्व घटकातील, सर्व क्षेत्रातील नागरिक बंधू भगिनींना नम्र विनंती की त्यांनी पुढे येऊन या कार्यास मदत करावी.

आलूरे गुरुजींची तरुण भारत शी असलेले हे ऋणानुबंध त्यांच्या पुढच्या पिढीने पण जपले आहेत, त्यांचे पुतणे अणदूर चे सरपंच रामचंद्र आलूरे हे सध्या आलूरे गुरुजींचा शैक्षणिक वसा वारसा पुढे नेत आहेत त्यांचेही तरुण भारत वर विशेष प्रेम आहे, तरुण भारत च्या वाढीमध्ये आलूरे कुटुंबाचा सिंहाचा वाटा असून तरुण भारत च्या प्रत्येक कार्यक्रमाचे निमंत्रण आलूरे कुटुंबाला असतेच तसेच शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर च्या सर्व शाखांच्या सकारात्मक बातम्या या तरुण भारत मध्ये हमखास छापून येत असत तीच परंपरा पुढेही चालू असून, अणदूर परिसरात तरुण भारत एक चांगली सकारात्मक विचार घेऊन विकासात्मक बातम्या छापून लोकांच्या अडीअडचणी सोडवण्यावर भर देतोय अणदूर परिसरातील३५ गावामध्ये तरुण भारत ची क्रेझ असून सकारात्मक, संवेदनशील पत्रकारिता करून जनतेची सेवा करण्याचं कर्तव्य तरुण भारत सातत्याने करतोय या मध्ये स्व आलूरे गुरुजींचे महान विचारांची जोपासना करून ते सामान्यांपर्यंत पोचवण्याच काम तरुण भारत सातत्याने करतोय, आज सोलापूर तरुण भारत चा वर्धापन दिन पण साजरा होत आहे, या प्रसंगी स्व गुरुजींची आठवण होणे स्वाभाविक होते, त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करून त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी तरुण भारत सदैव तयार असल्याची खात्री या प्रसंगी देऊन, आगामी काळात तुमच्या शैक्षणिक दिंडीत तरुण भारत आपला रोल नक्कीच निभावेल, यात काही शंकाच नाही गुरुजींचे शैक्षणिक कार्य असेच बहरत राहो तसेच सोलापूर तरुण भारत ची वाटचाल अशीच यशस्वी होवो एवढीच अपेक्षा या प्रसंगी



**श्रीकांत अणदूरकर**
प्रतिनिधी, दै तरुण भारत अणदूर



# ।। कर्मयोगी दीपस्तंभ ।।

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
शनिवार, २ ऑगस्ट २०२५





## चिरंतन सुगंधित दरवळ : कर्मयोगी सि.ना.आलुरे गुरूजी



ग्रामीण भागातील गोरगरीब,सर्व सामान्य लोकांच्या घराघरातील अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश निर्माण करण्यासाठी शिक्षणाचा ज्ञानवृक्ष निर्माण करणारे कर्मयोगी, शिक्षणमहर्षी स्वर्गीय सि.ना.आलुरे गुरूजी यांची ४ थी पुण्यतिथी आपण संपन्न करत आहोत, त्यानिमित्त प्रथमतः त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन..!

कर्मयोगी,शिक्षणमहर्षी सि.ना. आलुरे गुरूजी यांचा जन्म ६ सप्टेंबर १९३२ रोजी अणदूर येथे झाला.विज्ञान विषयातून उच्च पदवी मिळाल्यानंतर अनेक शासकीय नोकरीच्या संधी गुरूजींना सहज खुणावत होत्या,शिक्षक पदाची नोकरी स्वीकारुन पवित्र अशा शैक्षणिक प्रवाहात ते दाखल झाले.तेथे ही त्यांचे मन रमत नव्हतं, सामाजिक कार्याच्या उर्मीतून त्यांनी शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य हाती घेऊन समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवून महान कार्य केले.


प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक, महाविद्यालय, रात्रशाळा, वस्तीगृहे सुरू केली. तुळजापूर तालुक्यात शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर व बालाघाट शिक्षण संस्था, नळदुर्ग श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय या शिक्षण संस्थांच्या माध्यमातून तुळजापूर तालुका शिक्षणमय करणारे फक्त गुरूजी हेच होते. शिक्षणाची ज्ञानगंगा सर्व सामान्यांपर्यंत पोहचण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करत आयुष्यभर शैक्षणिक धडपड करून आज ज्ञानाचा वटवृक्ष उभा करणारे गुरूजी म्हणूनच मराठवाड्याचे साने गुरुजी म्हणून ओळखले जातात.महात्मा गांधीजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साने गुरुजी,कर्मवीर भाऊराव पाटील,विनोबा भावे,स्वामी विवेकानंद,रविंद्रनाथ टागोर,राजर्षी शाहू महाराज यांचे विचार प्रत्यक्षात जगणारे गुरूजी होते.


शिक्षणाबरोबर राजकारण,सहकार, समाजकारण,प्रौढ शिक्षण,साक्षरता प्रसार व प्रचार, अंधश्रद्धा निर्मूलन,अस्पृश्यता निवारण,स्त्रीयांना मान या सर्व क्षेत्रात कृतीशील व आदर्श जीवन ते जगले. उक्ती आणि कृती,सत्याचा स्वीकार यात तुसभर ही कधी फरक त्यांनी पडू दिले नाहीत.पैसा,प्रसिद्धी,प्रतिष्ठा,मान-सन्मान याचा लोभ न धरता जगत राहिले.नैतिक व संस्कार शील सामर्थ्याचे प्रचंड अधिष्ठान त्यांच्या विचाराला होते.गुरूजींचे जीवन म्हणजे तत्वनिष्ठ व सत्त्वशिल प्रेरणास्रोतच होते.आज जरी गुरूजी आपल्यात नसले तरी,आपण त्यांचे अनुयायी म्हणून त्यांच्या जीवनातील एक-एक पैलू अंगी बाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे,तेव्हाच आपण त्यांचे अनुयायी म्हणून घेण्याचा आपणास अधिकार प्राप्त होईल असे मला वाटते.आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन व स्मरण..!




**शब्दांकन- श्री.सिध्देश्वर चंद्रकांत मसुते,**
**जवाहर विद्यालय, अणदूर.**



































# गुणवत्ता पूर्ण शिक्षण व शिस्तीचा मानदंड : साने गुरुजी विद्यालय,केशेगाव

शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर ता.तुळजापूर या संस्थेची १० जुलै १९५९ रोजी जवाहर विद्यालय अणदूरच्या रूपाने मुहूर्तमेढ रोवली गेली. जवाहर विद्यालयाने शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र क्रांती घडवली. महाराष्ट्रात शालांत प्रमाणपत्र परीक्षेत मार्च १९९३ला सर्वप्रथम आलेला विद्यार्थी सचिन हराळकर याने संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला अणदूरला जवाहर विद्यालय आणि तुळजापूरला श्री. कुलस्वामिनी विद्यालय सुरू करून तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व जीवनातील सुसंस्कार व शिस्त यांचा आदर्श घालून दिला . शिक्षण महर्षी कै. सि.ना आलुरे गुरुजी यांनी नंतर ग्रामीण भागामध्ये मुला मुलींना शिक्षण मिळावे यासाठी विशेषतः मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची गावातच सोय व्हावी यासाठी तुळजापूर तालुक्यात विविध ठिकाणी माध्यमिक विद्यालये सुरू केली .

केशेगाव ता. तुळजापूर येथे गावकऱ्यांच्या आग्रहास्तव व मागणीप्रमाणे साने गुरुजी विद्यालयाची स्थापना दिनांक १५ ऑगस्ट १९९० रोजी करण्यात आली. इयत्ता आठवीच्या वर्गाने सुरुवात होऊन पुढे दहावीपर्यंत वर्ग उघडण्यात आले . मार्च १९९३ ला दहावीची पहिली बॅच बाहेर पडली.

केशेगावात जिल्हा परिषदेची शाळा इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी पर्यंतच होती. पुढील माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून संस्थेने मुला-मुलींना परगावी जाण्याचा त्रास वाचावा म्हणून गावातच विद्यालयाची सुरुवात करून मुलींच्या शिक्षणाची सोय केली. जवाहर विद्यालय,अणदूर येथे जे उपक्रम राबवले जायचे ते सर्व शैक्षणिक उपक्रम साने गुरुजी विद्यालयात राबवले जातात . गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी व शिस्त आणि संस्कार देणारी शाळा म्हणून साने गुरुजी विद्यालय नावारूपाला आले आहे. शाळेच्या स्थापनेपासून प्रभारी मुख्याध्यापक म्हणून श्री. शिवानंद जळकोटे, श्री. सुरेश ठोंबरे ,श्री .गोपाळ कुलकर्णी यांनी उत्कृष्टपणे कार्य केले. जेव्हा विद्यालयास १९९७-९८ वर्षी १००% अनुदान प्राप्त झाले तेव्हापासून कै. सिद्रामप्पा कुंभार गुरुजी, श्री दिगंबर काळे गुरुजी, श्री. महादेवप्पा नरे गुरुजी ,श्री. नवनाथ संगशेट्टी गुरुजी, श्री. शिवाजी राठोड गुरुजी, श्री .बबन लाखाडे गुरुजी, श्री अरविंद उंबरजे गुरुजी व श्री जयंत जाधव गुरुजी यांनी विद्यालयाचा नावलौकिक वाढवण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. कै. सिद्रामप्पा जळकोटे ,कै. बाबुराव पाटु, कै. इरप्पा साखरे ,कै. शंकरराव साखरे ,कै. सिद्रामप्पा कोरे ,कै. रेवणसिद्ध पाटू सर, कै.गुरुसिध्दप्पा पाटू सर,श्री.जयवंतराव पांचाळ,कै.महादेवप्पा हुकिरे,कै. विश्वनाथ हंद्राळे,कै.सिद्रामप्पा पाटील,कै.सिद्धलिंगप्पा साखरे,श्री.शिवशेट्टी मामा,कै.नवलिंगप्पा जळकोटे,कै. जाफरभाई फुलारी यांचे विद्यालयाच्या स्थापनेत व विकासाच्या वाटचालीत खुप मोठे योगदान लाभले आहे. विद्यालयात विविध शैक्षणिक उपक्रमात विविध महापुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या करणे, विविध शाळाबाह्य स्पर्धा परीक्षात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, दरवर्षी विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, शैक्षणिक सहलीतून विद्यार्थ्यांना पर्यटनाचा आनंद मिळवून देणे, अशा विविध उपक्रमांचा समावेश करता येईल .विद्यालयातील विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी आमदार, शिक्षणमहर्षी कै. सि. ना आलुरे गुरुजी ,माजी आमदार कै. शिवाजीराव पाटील बाभळगावकर साहेब, मा. श्री .मधुकररावजी चव्हाण साहेब ,मा.श्री. बसवराजजी पाटील साहेब, कै. भाई वैद्य कै. सदानंद वर्दे साहेब,माजी शिक्षणमंत्री, जिल्हाधिकारी सौ. गवई मॅडम व अनेक शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या आहेत. विद्यालयाची गुणवत्तेची परंपरा कायमच उज्वल अशी राहिलेली आहे. विद्यालयातील तीन वर्ग खोल्या १९९३- ९४ यावर्षी गावकऱ्यांनी वर्गणी करून श्रमदानातून बांधल्या आहेत. पुढे कै. सिद्रामप्पा कुंभार गुरुजी यांच्या मुख्याध्यापक कार्यकालात एका खोलीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले . शाळेच्या समोरचे फरशी काम श्री. महादेवप्पा नरे गुरुजी व श्री नवनाथ संगशेट्टी गुरुजी यांच्या कार्यकालात पूर्ण झाले. संपूर्ण विद्यालयात सिमेंटचे प्लास्टर करण्याचे कामही श्री.नरे गुरुजींच्या काळात पूर्ण झाले.



विद्यालयात शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी पुढे उच्च शिक्षण घेऊन मोठ मोठ्या पदापर्यंत पोहोचले आहेत. डॉक्टर, इंजिनियर, वकील ,शिक्षक, मुख्याध्यापक अशा पदापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. विविध ठिकाणी क्लास वन अधिकारी व क्लास टू अधिकारी म्हणून ही विद्यार्थी कार्यरत आहेत. गावातील लिंगायत समाजाच्या मठात शाळा गेली ३५ वर्ष ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहे. मठातच श्री. सिद्ध रामेश्वराचे मंदिर आहे. त्यामुळे या ठिकाणी धार्मिक मठ, सिद्धरामेश्वराचे मंदिर व विद्यामंदिर असा त्रिवेणी संगम झाला आहे. त्यामुळे ही भूमी पावन पवित्र अशी भूमी आहे .आजही या विद्यालयात तीन वर्गात १३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षण महर्षी कै. सि.ना .आलुरे गुरुजी यांच्या दूरदृष्टीमुळे ग्रामीण भागातल्या मुली मोठ्या संख्येने माध्यमिक शिक्षण घेत आहेत. व पुढे विविध क्षेत्रात उत्कृष्टपणे कार्यरत आहेत.

विद्यालयात श्री. पंडित पाटील सर ,श्री. गोपाळ कुलकर्णी सर, श्री .प्रदीप कदम सर ,श्री. किरण कोरडे सर यांनी दीर्घकाल सेवा दिली आहे .सध्या विद्यालयाचे विद्यमान मुख्याध्यापक म्हणून श्री जयंत जाधव सर आहेत. श्री अनिल गुरव सर ,श्री प्रदीप कदम सर, श्री शिवाजी खुडे सर सध्या अध्यापनाची धुरा सांभाळत आहेत. लिपिक म्हणून श्री. धनराज साखरे सर तर सेवक म्हणून श्री.अबुलकलाम मोहिद्दीन सय्यद व श्री.हनुमंत पवार कार्यरत आहेत.

गुणवत्तेची व शिस्तीची परंपरा आजही अव्यहतपणे अखंडपणे चालू आहे. केशेगावातील शिक्षणप्रेमी नागरिक व वसई विरार येथे नोकरी निमात्ताने वास्तव्यास असणारे श्री. चनबसप्पा पाटू यांनी मुंबईतल्या विविध देणगीदाराकडून देणग्या मिळवून अनेक वर्षे गावातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले आहे.त्यामुळे शिक्षणासाठी ग्रामीण विद्यार्थ्यांना खूप मोठा आधार मिळाला. विद्यालयातल्या सेवकांनी विद्यालयाच्या प्रांगणात विविध प्रकारची झाडे लावून उत्तमपणे वाढवली आहेत. त्यामुळे विद्यालयाचा परिसर हिरव्यागार वृक्षवेलींनी नटला आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनेक तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. चित्रकला स्पर्धेतही मोठ्या संख्येने विद्यार्थी बसतात व यशस्वी होतात. विज्ञान प्रदर्शनात ही शाळेचा सहभाग दरवर्षी असतो. विद्यालयाने पुज्य.साने गुरुजी जयंती निमित्त ग्राम स्वच्छता मोहीम अनेक वर्ष राबविली आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री. भारत मामा कस्तुरे ,सचिव मा. श्री रामचंद्र दादा आलुरे ,मार्गदर्शक ड.लक्ष्मीकांत पाटील साहेब, मा. श्री .भालचंद्र बिराजदार साहेब यांच्या मार्गदर्शनाने मुख्याध्यापक जयंत जाधव सर यांनी विद्यालयाची वाटचाल यशस्वीपणे चालू ठेवली आहे .शिक्षण महर्षी कै. सि.ना. आलुरे गुरुजी यांचे ग्रामीण भागातल्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे हे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी अहोरात्र कष्ट घेत आहेत. माजी आमदार,शिक्षणमहर्षी कै. सि.ना.आलुरे गुरुजींना पुण्यतिथीनिमित्त विद्यालयाच्या वतीने विनम्र श्रध्दांजली!!



**प्रदीप कदम, सहशिक्षक**

# साधेपणातलं सौंदर्य: सि.ना. आलुरे गुरुजी

मंगल सुखद अनुभूतीने नटलेलं शिक्षणातून जीवन घडविणार नेतृत्व जीवनभर ज्ञानदान करून सर्वसामान्यांचे जीवन फुलविणार कर्तृत्व असाहाय, एकाकी ,अबोल जणांच्या समर्पणात सुख मानणार व्यक्तित्व वरदानातून अमृत वर्षाव करणार दातृत्व म्हणजे शिक्षण महर्षी सि.ना. आलुरे गुरुजी.

फुल कितीही सुंदर असले तरी कौतुक त्याच्या सुगंधाचे होते. माणूस कितीही मोठा असला तरी कौतुक त्याच्या कर्तृत्वाचे होते. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले असे गुरुची म्हणायचे. जवाहर विद्यालयाच्या भिंतीवर गुरुजींनी लिहून ठेवलेला आहे. 'मनभर उपदेशापेक्षा ,कणभर आचरण श्रेष्ठ आहे ' गुरुजी आपल्या जीवनात साधी राहणी आणि उच्च विचारसरणीला महत्त्व दिले. साधेपणातलं सौंदर्य अमिटआहे .सुंदर असणं म्हणजे तसं दिसणं महत्त्वाचे आहे.बाह्य सौंदर्य पेक्षा अंतरंगाचे सौंदर्य मोलाचे असते. एक सुंदर व्यक्ती म्हणून जगण्यापेक्षा एक सुंदर व्यक्तिमत्त्व म्हणून जगा कारण शरीर क्षणभंगुर आहे. शरीराची सुंदरता कधी न कधी संपते पण सुंदर व्यक्तिमत्व मात्र सदैव जिवंत राहते. असे गुरुजी वारंवार सांगायचे पावला पावलावर त्याचे दर्शन आम्हाला व्हायचे . कारण प्रत्यक्ष गुरुजी तसे जगले स्वतः जपले चीडळाश्रि लळीं ळी पीं रीळाश्रिश' साधेपणा हे साधे नाहीच. साधेपणातले संस्कार शुद्ध आचरण गुरुजींच्या मातोश्री लोकमाता उर्फ कै. लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे यांच्यात दिसून येते. तेच संस्कार गुरुजींवर झाले.

लोकमाता या अन्नपूर्णा होत्या. शेतात येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरू साठी त्या जास्तीचे शिदोरी बांधून घेऊन जायच्या भुकेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी मिळाले की ते तृप्त व्हायचे. दिवाळी हा सण आनंदाचा, प्रकाशाचा ,तेजाचा पण ज्या गरीब वंचितांच्या जीवनात कायमचे अंधार राहिले त्या गरिबांसाठी प्रत्येक वर्षी फराळाचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करण्याचे कार्य लो कमात्ता अक्कांनी केलेला आहे. हे सहज आणि साधेपणाचे संस्कार गुरुजींवर प्रत्यक्ष व परोक्ष रूपाने झालेले दिसतात. आजही ही अखंड सेवा संस्थेचे सचिव रामचंद्र दादा आलुरे यांच्या माध्यमातून चालू आहे.

गुरुजी चार बाय चार च्या पत्र्याच्या खोलीत राहायचे . शेणाने सारवलेली जमीन हीच त्यांची बैठक होती. बैठकीतले चारी भिंती कर्मसौंदर्याने गुरुजींना मिळालेल्या अनेक सन्मानाने नटलेल्या दिसायच्या. बैठकीत भेटायला आलेले अनेक मंडळी भारावून जायचे. गुरुजींचे व्यक्तिमत्व म्हणजे एक जलप्रपातच होते. डोक्यावर पांढरी शुभ्र टोपी, सदरा ,धोतर डोळ्यावर चष्मा ,चेहऱ्यावर अप्रतिम सौंदर्य ,तेज आणि प्रसन्नता यामुळे प्रत्येकाला त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावेसे वाटायचे.

गुरुजीनी अणदूरच्या पंचक्रोशीत गोरगरीब मुलांसाठी शाळा काढल्या. गाव परिसरातल्या गरीब होतकरू शेतकऱ्यांच्या शिक्षण घेऊन बेकार फिरणाऱ्या मुला-मुलींना सेवा करण्याची संधी देऊन त्यांचे संसार फुलविले .' आधी हाताले चटके ,मग मियते भाकर याची जाणीव करून दिली. भौतिक सुविधेपासून शाळा दूर राहिल्या तरी चालतील पण उच्च दर्जाचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे हा महानउद्देश होता. आणि ते सिद्ध करून दाखविण्याचे कार्य यशस्वी झाल्याचे आपल्याला दिसून येते १९९४ मध्ये शालांत प्रमाणपत्र परीक्षेत अणदुर सारख्या खेड्यातल्या पत्र्याच्या खोलीत शेणाने सरळलेल्या वर्गात शिकलेला सचिन हराळकर महाराष्ट्रात पहिला येतो आणि जवाहर विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवतो हे साधी राह णी उच्च विचारसरणीची विजय नाही का ? असे अनेक विद्यार्थी गांधी टोपी घालून शिकले. जागतिक पातळीवर पोहोचले आहेत . आजही जवाहर परिवारातील विद्यार्थ्यांच्या डोक्यावर गांधी टोपी शोभून दिसते .खेड्यातला विद्यार्थी महाराष्ट्रात पहिला कसा येऊ शकतो ? अशा प्रकारची शंका घेतल्यावर गुरुजी शांत बसले नाहीत सतकार प्रसंगी सचिनला खेड्यातला म्हणून अनुभव व्यक्त करण्यासाठी संधी देत नाहीत, डावलतात. त्यावेळी आत्मविश्वासाने गुरुजी सचिनला उभे करतात आणि सचिनच्या वाणीतून साक्षात सरस्वती प्रकट होतानाचे पाहून सगळे स्तब्ध होतात. असे अनेक अनुभव गुरुची घेत राहिले आणि अनुभवाचे धडे देत राहिले . जणू गुरुजी विद्यार्थ्यांना म्हणायचे..



टेढे मेढे राहो पर तू धीरे धीरे चलना शिख ,चांद जैसा शितल बन सुरज जैसा जलना शिख मिट्टी का तू है पुतला हर सांचे मे ढलना शिख.

वेड्यावाकड्या रस्त्यावर तू हळूहळू चालायला शिक चंद्रासारखं शितल आणि सूर्यासारखं प्रखर हो मातीचा तू आहेस पुतळा प्रत्येक साचेत बसणं शिक . आपला विद्यार्थी प्रत्येक साच्यात बसला पाहिजे. ही तळमळ गुरुजींची होती. त्या तळमळीचे फलित म्हणजे सुरवंटाचे फुलपाखरू व्हावं तसं शिक्षणरुपी रोपट्याचे वटवृक्षात रूपांतरित झालेले दिसते. आज बालगृहापासून ते महाविद्यालयापर्यंत (झह.ऊ)ज्ञानदानाचे कार्य अविरत चालू आहे. गुरुजी हेच आमचे ' संस्काराचे विद्यापीठ' आहेत. प्रत्येक गोष्ट निरखून , पारखुन सूक्ष्म अभ्यास करून, टिप्पणी काढून मार्गदर्शन करणारे, आळस त्यांना कधी स्पर्श केलाच नाही. गुरुजींना प्रत्येक शाखेची काळजी होती .एक संस्थापक असून सुद्धा प्रत्येक कार्यक्रमाला हजर राहिल्याचे पाहून पश्चिम बंगालचे कुलगुरू मुखोपाध्याय भारावून गेले होते. नॅक समितीचे अध्यक्ष म्हणून उपाध्याय महाविद्यालयात आले होते .गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाने ते भरून गेले.

अत्यंत कडक शिस्तीचे कुलगुरू त्यांच्या स्वागतासाठी आम्ही पुणे विमानतळावर गेलो त्यांचे प्रथम दर्शन एपीजे अब्दुल कलाम यांच्या सारखे व्यक्तिमत्व, त्यांना मदत करावे म्हणून सुटकेसला हात लावताच मौनावस्थेत मान हलवून जणू काय माझे काम मला स्वतः करावयाचे आहे याचे संकेत दिले. स्वावलंबी जीवन जगणारे, खादी वस्त्र परिधान केलेले, एक मस्त मौला व्यक्तिमत्त्व वाटले . शुद्ध आचार, पवित्र विचार, सीमित आहार आणि स्वच्छंद विहार खूप काही सांगून गेले.

महाविद्यालयात आगमन होताच दुतर्फा विद्यार्थी उभे करून साधेपणाने पश्चिम बंगाल, पंजाब व कर्नाटक येथून आलेल्या टीमचे स्वागत करण्यात आले. गुरुजी स्वागताला उपस्थित होते. स्वागत समारंभा नंतर महाविद्यालयाची तपासणी गुरुजींच्या अनुपस्थितीत सुरू झाले. जाताना गुरुजी म्हणाले, जे आहे ते खरं सांगा खोटं सांगायची आवश्यकता नाही. हे कमिटी येण्यापूर्वीच गुरुजींनी आम्हाला ठासून सांगितलेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.फुलारी यांचे योग्य मार्गदर्शन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे कर्तृत्व, पालक मेळाव्याच्या माध्यमातून पालकांबरोबर झालेली चर्चा आणि सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून मनोरंजनातून केलेले प्रबोधन पाहून कमिटी भारावून गेली. छोट्या मोठ्या कार्यक्रमाला गुरुजींची उपस्थिती ,त्यांचे साधेपणा त्यांना भावले .एक संस्थापक असून सुद्धा विद्यार्थ्यांच्या पाठीवरती थाप देण्यासाठी उभे राहतात .याची आश्चर्य वाटले. विशेष म्हणजे दिवसभर त्यांनी ज्या ठिकाणी फिरले होते. त्याच ठिकाणी आम्ही स्टेज तयार केले होते. कुठल्याही प्रकारचे चमक धमक नाही. अत्यंत साधेपणा जे आहे तेच दाखवल्यामुळे प्रभावित होऊन मार्गदर्शनपर बोलताना त्यांनी व्यक्त केलेले विचारा अत्यंत बोलके होते. ते म्हणाले ,आम्ही उत्तर प्रदेश मध्ये एका मोठ्या महाविद्यालयामध्ये गेलो होतो. तेथे आमच्या मनोरंजनासाठी बाहेरून भाडोत्री कलाकार आणले होते. तुम्ही सांगा कागदी फुलातून कधी सौंदर्य दरवळेल का? तुमच्याकडून खूप घेण्यासारखे आहे .खेड्यातच खरे सौंदर्य आहे. खेड्यातले विद्यार्थी कुठेच कमी पडणार नाहीत. म्हणून याची पावतीच दिली. ' हिरव्या पिवळ्या माळावरून हिरवी पिवळी शाल घ्यावी, सह्याद्रीच्या कड्याकडून छातीसाठी ढाल घ्यावे .अशी अवस्था आमची झाली. त्यांनी आमच्यासाठी निर्भयाचे ढाल देऊन गेले. जाताना गुरुजींआणि कुलगुरू मुखोपाध्याय यांची भेट झाली .साधेपणातल्या सौंदर्यावर प्रेम करणारे दो हंसो का जोडाची प्रचिती आम्हाला आली. साधी राहणीआणि उच्च विचारसरणी वर मार्गक्रमण करणाऱ्यांचे नेहमी स्वागत होते. सत्य आणि साधेपणाचाच हा विजय न्हवे का?

परतीचा प्रवास सुरू झाला. पुण्याच्या विमानतळावर त्यांना सोडायला जायचे भाग्य आम्हाला लाभले. आम्ही जाईपर्यंत आमच्या सानिध्यात राहा. आपल्याला सोडून जाणं हा विरह सहन करण्या पलीकडचा आहे. हे वाक्य होते त्या कडक शिस्तीच्या महान व्यक्तिमत्त्वाचे .आम्ही एकमेकांच्या स्नेहात बुडून गेलो होतो अशी माणसं जीवनात येतात आणि स्मृती ठेवून जातात. आज गुरुजींचा स्मृतिदिन गुरुजी, मुखोपाध्याय आपल्याला सोडून गेले पण खूप काही देऊन गेले. त्यांचे कर्तृत्व साधेपणातले सौंदर्य सतत मार्गदर्शन करत राहणार आहे. अनंतात विलीन झालेल्या या व्यक्तिमत्वाचे आपल्यावर आशीर्वाद ,कृपाक्षत्र निश्चितच आहे. म्हणूनच ज्यावेळी न्याक कमिटीचा निकाला आला, चांगल्या दर्जाचे मानांकन प्राप्त झाल्याचे कळले .खेड्यातले महाविद्यालय आनंदाचे अत्युच्च शिखर गाठल्यानंतर जे आनंद होते ते प्रत्येक कर्मचाऱ्यांचे चेहऱ्यावर झळकले .ही दोन्ही व्यक्तिमत्व कमालीचे साधे आणि मनाने खूप श्रीमंत होते.

भावना जर निस्वार्थ असेल तर माणूस आपल्या मनाएवढा मोठा होऊ शकतो. माणसाच्या मोठेपणाला शरीराची मर्यादा नसतेच. मनामध्ये आकाशाला गवसणी घालण्याची शक्ती असते. सुखाच्या मागे लागून आपण त्याला शरीरापुरते मर्यादित करून टाकतो .संयम आणि निग्रह हे स्वभावात रुजले तर हवे असलेले सगळे आधार आतूनच येतात. पक्षांना पंख आतून फुटतात. बियाना कोंब आतून फुटतात. आईला ,गाईला पान्हा आतून फुटतो . कष्ट आणि श्रमातच स्वर्ग आहे असे महात्मा बसवेश्वर म्हणतात. कष्ट, श्रम करीत राहूनच जीवनाचा बगीच्या फुलवावा लागतो .जीवनरूपी बगीच्या फुलवताना दुःखाचे काटे टोचतच राहतात. पाडवाकरांच्या भाषेत ,' काटे पायात रुतून बसतात, हे अगदी खरं असतं. आणि फुले सुद्धा फुलून येतात हे काय खरं नसतं? काट्यासारखं सलायचं की फुलासारखं फुलायचं. तुम्हीच सांगा कसं जगायचं कण्हत कण्हत की गाणं म्हणत .मित्रांनो ! स्वतःच्या पायातले काटे काढता येत नाहीत पण दुसऱ्याच्या पायातले काटे काढता येतात .स्वतःचे दुःख कुरवाळत बसले तर इतरांच्या डोळ्यातले अश्रू दिसतच नाहीत. मग ते पुसण्याचे विचार कसे सुचणार... पुसणार कोणी असेल तर डोळे भरून यायला अर्थ आहे. कोणाचे डोळे भरणार नसतील तर मरण सुद्धा व्यर्थ आहे. इतरांचे डोळे पुसणे.. इतरांच्या पायातील काटे काढणे आणि अश्रू पुसणे यातला आनंद जो अनुभवतो त्याच्या एवढा श्रीमंत या जगात असूच शकणार नाही. म्हणून मित्रांनो ! गुरुजींचे आदर्श समोर ठेवून साधेपणातले सौंदर्य स्वीकारू या .. साधेपणात सुख आणि अमिट सौंदर्य आहे. आनंदाचे भरते आहे. यात आकंठ डुंबू या. साधेपणातल्या प्रवासाचे या रस्त्यावर चालणाऱ्यांचे स्वागत करू या आपण ही वाटसरू होऊ या.आसमंतात अस्तित्व अन् ढगात दडती मिनार ज्यांचे निळे सुवर्णदीपामध्ये स्नेहमय वात जिथे प्राजवळे त्यागून शेषासना विहरते प्रेरणा ज्या स्थळी पायघड्यास्तव जिथे शिंपती मोत्यांच्या ओंजळी.

चौथ्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!



**- प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार,**
**जवाहर महाविद्यालय, अणदूर**

# गुरुजी म्हणजे माझ्या जीवनातील दैवी अविष्कार!

गुरुजींना शब्दरूपी आदरांजली वाहताना अनेक प्रसंग डोळ्यासमोर उभी राहतात, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेताना हे इतकं सोप्प नाही याची वारंवार जाणीव होते आणि खरं सांगायचं तर उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणण्यापेक्षा एक दैवी अनुभूतीला शब्दात मांडणं एका सामान्य व्यक्तीसाठी महादिव्य अशी गोष्ट आहे तरीही त्याचही आज धाडस करते आहे कारण शब्दरूपी फुलं त्यांच्या चरणी नतमस्तक होण्याचा हा एक वेडपट प्रयोग म्हटलात तरी चालेल पण देव भेटला आणि अनुभव देऊन गेला त्या देवासाठी शब्द काहीच नसली तरी भाव मात्र तितकेच समर्पित आहेत याचं जाणीवेने व्यक्त होते आहे.

गुरुजींना ओळखणं इतकं सहज नव्हतं, गुरुजी म्हणजे प्रचंड ज्ञान, दूरदृष्टी, जितके वैचारिक तितकेच भावनिक, सर्व नियम मुखोदगत असणारे भांडार समजून घेणं खूप अवघड होतं आणि ते शेवटपर्यंत उमजलंच नाही इतक्या गूढ व्यक्तिमत्वाच्या पवित्र सानिध्यात आयुष्याचे धडे घेता आली हे आमचं भाग्यच म्हणायचं.

गुरुजींचे स्मरण करताना त्यांच्या तीक्ष्ण नजरेचा धाक आजही जाणवतो, उडत्या पक्षाचे पंख मोजणे या म्हणीचा अर्थ त्यांच्या नजरेत सापडायचा, कोण,कसा, कधी खोटं किंवा चुकीचं बोलेल याचा त्यांना अगोदरच अंदाज यायचा आणि मग त्यांचा एक कटाक्ष समजणाऱ्यांसाठी पुरेसा असायचा. विद्यापीठ नियमावली असेल अथवा शासन नियमावली असेल गुरुजींसाठी एक नजर पुरेशी असायची, आपण काही सांगण्याच्या आत गुरुजी केवळ विषयसूची पाहूनचं पुढील कार्यवाही कशी करायची असते याची सूचना द्यायचे, नियम त्याचे परिणाम, त्याची आवश्यकता, त्याचे जतन या सगळ्या गोष्टीचे मार्गदर्शन क्षणात करून द्यायचे.केवळ भाषज्ञानचं नव्हे तर वर्णोच्चार योग्यप्रकारे केले पाहिजेत यावर देखील त्यांचे लक्ष असायचे. उच्चारातील चुका गुरुजींना आवडत नसत, शब्दावर आपली शास्त्रीय पकड असावी याचा निग्रह असायचा. त्यामुळे गुरुजींना शब्दोच्चारातील चुका झटकन लक्षात यायच्या आणि चेहऱ्यावर उमटलेली एक लकेर मनात धडकी भरून जायची.

गुरुजी म्हणजे एक स्वतंत्र विद्यापीठ. त्यांचे प्रगाढ वाचन आणि भाषणात देण्यात येणारे संदर्भ भल्याभल्याना विचार करायला लावायचे, त्यांची मराठी भाषेवर असणारी पकड, व्याकरणातील बारकावे उच्च शिक्षणाचे कागदी सर्टिफिकेट दाखविणाऱ्या लोकांना स्वपरीक्षण करण्यास भाग पाडावे लागत असत. केवळ मराठी मातृभाषेवर त्यांची पकड होती असं म्हटलं तर चुकीचं होईल, त्यांचा उर्दू, इंग्रजी, हिंदी भाषांचा अभ्यास देखील तितकाच वजनदार होता, हे सतत प्रत्ययास येत असे. इंग्रजीत असणारे परिपत्रकातील केवळ विषय मजकूर वाचल्याक्षणी त्या नियमावलीत नेमकं काय अपेक्षित आहे ते गुरुजी सांगून द्यायचे. त्यामुळे त्यांना देण्यात येणाऱ्या पत्रांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांच्यासमोर उभा राहणं म्हणजे अवघड होतं. केवळ मजकूर माहित असून चालणार नव्हतं मुळी तर पत्र सादर करणाऱ्या पाकिटावर काही चुका झाल्यात का हे अनेकदा तपासून, खात्री केल्याशिवाय पाकीट बंद केलं जात नव्हतं आणि नेमक्या त्यांच्या याचं तीक्ष्ण नजरेनी मला कामातील अचूकता टिपायला शिकविले, सादरीकरण शिस्तीत कसं असावं याचं ज्ञान दिलं, नियमाचा तर्कशुद्ध अभ्यास कसा करायचा असतो याचे धडे गिरविता आले.कोणतीही गोष्ट मग ती छोटी असो अथवा मोठी त्याचं प्राथमिक नियोजन कसं असावं, त्याची प्रत्यक्षात कृती होत असताना त्याचं उदात्तीकरण कसं करावं हे गुरुजीच्या मार्गदर्शनातून शिकण्यात आलं म्हणून आज जगण्याला शिस्त लागली. उगाच उथळपणा कार्यक्रमाची मूल्ये धुळीस मिळवीत असतो हे गुरुजींनी नेहमी त्यांच्या कृतीतून दाखवून दिलं हे माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीला सहज समजणं शक्यच नाही, वेळ जायला लागेल, वर्षे सरतील तेव्हा कुठे गुरुजींच्या व्यक्तिमत्वाचा एखादा कोपरा समजून घेता येईल.

मला अचंबित करणारी सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांची अफाट स्मरणशक्ती आणि ते म्हणजे म्हणजे एक दैवी चमत्कार, दैवी अविष्कार. कित्येक घटना, त्यातील व्यक्ती, त्यांचं कर्तृत्व अगदी एकानंतर एक अशा अचूक आणि सलग साखळीत बंदिस्त कशी व्हायची याचा नेहमीच प्रश्न पडायचा. इतकी स्मरणशक्ती असूचं कशी शकते नेहमीच प्रश्न पडायचा पण म्हणतात ना हे असामान्य व्यक्तिमत्वाचं एक सुरेख, मौलिक पैलू आहे, प्रत्येकाला थोडंच जमेल असं? अशक्यचं! म्हणून अशक्यालाही शक्य करणारी ही दिव्य अनुभूती आम्हाला अनुभवता आली यात आपला जन्म सार्थकी लागायचा होता म्हणून हे घडलं असं म्हटलं तर वावग काय? नाही ना

माझ्या आयुष्यात अनेक गुरु भेटले, त्यांच्यामुळे जीवनाला कलाटणी निश्चितचं मिळाली पण प्रशासनातील, निरीक्षणातील जगण्यातील सोपस्कर मात्र गुरुजींमुळेच समजली यात वादचं नाही. गुरुजींनी आमच्या आयुष्याचं सोनं केलं असं म्हणण्यापेक्षा ते यतार्थ सार्थकी लावण्यासाठी संधी निर्माण करून दिली असं म्हणावसं वाटतं. त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न चालुचं आहे आणि राहणार पण जोवर हे आयुष्य आहे तोवर त्यांचे आशिर्वाद, त्यांची कृपादृष्टी आम्हावर सतत असावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना!



**- प्रोफेसर. डॉ.अनिता मुदकण्णा**
व्हाईस चेअरमन,शि. प्र.मं. शिक्षक पतसंस्था, अणदूर
माजी प्राचार्य, इंग्रजी विभाग प्रमुख
जवाहर महाविद्यालय, अणदूर

## आधार वड .. स्व. आलूरे गुरुजी

पुण्याई कुठल्या जन्मीची
अणदूरला सुंदर शाळा लाभली
पंचक्रोशीच्या शिवारात जणू
गुरुजींनी,
ज्ञानाची पाणपोई खुली केली ।।।।
आलूरे गुरूजींची दूरदृष्टी
गरीबांची मुले व्हावीत मोठी
अंधश्रद्धा, अज्ञानाला लाभावी नवी दृष्टी
त्यासाठी केली सारी उठाऊठी ।।
चारित्र्य , सत्याता नि मेहनत
ह्या गुणत्रयीने माणूस होतो मोठा
हाच संस्कार रुजवत रुजवत
शाळेचा केला त्यांनी पाया पक्का ।।
उंच कद, करारी तरीही स्नेहाळ नजर
तांबूस गुलाबी गौर वर्ण, देखणी काया
शुभ्र शर्ट नि खादीचे धोतर , मुलांना वाटे
जणू लंडनहून आलेला गोरा बॅरिस्टर ।।
मुलींविषयी गुरुजींना लळा वाटे भारी
मायबाप बनून काळजी घेतली खरी
चुकलेले पाखरू रात्री घरट्याकडे परतावे
अडचणींच्या वेळी आम्ही गुरुजींकडे धावावे।।
शाळा म्हणजे गुरुजींचा प्राण
शाळेच्या माध्यमातूनच घेतले सेवेचे वाण
शाळा म्हणजे त्यांचे दुसरे घर
या कर्मे योग्याने केला. पीडितांचा संसार।।
आज मी जे काही आहे तुमच्या मुळेच आहे
ते सारे ज्ञान तुम्हीच दिले ,समृद्ध मी जाहले
तुमच्याच ज्ञान शिदेरीवर मी यशस्वी झाले
तुमच्या पावन स्मृतीस माझी ही विनम्र शब्दफुले।।
अशीच शाळा लाभावी अन्
अशाच गुरूच्या छत्रछायेत मी वाढावे
शाळेचे नि गुरूंचे ऋण मी
अभिमानाने जगात मिरवावे ।।



**- डॉ. कांचन जतकर,हैदराबाद**




# जनसामान्यांचा आधारवड

# श्री.विठ्ठलराव भाऊसाहेब वाडगे

**श्रीगोंदा ( जि.अहिल्यानगर)**

अनेक वर्ष दुष्काळी, नंतर विकसनशील, पुढे सिंचन क्षेत्र वाढल्याने विकसित होऊ पाहणाऱ्या श्रीगोंदा तालुक्यात ४ साखर कारखाने उभे राहिले. पण सिंचनातील गोंधळ, राजमार्ग आणि एमआयडीसी नसल्याने विकसित होऊ पाहणारा श्रीगोंदा तालुका पुन्हा विकसनशीलच्या मार्गावर आला असताना तालुक्याचे बागायत भागाचे बागायतीपण टिकविण्यासाठी येथील शेतकऱ्यांना कर्ज रूपाने तसेच उत्पादित शेत माल विशेषतः कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी, एमआयडीसीची कमतरता दूर करण्यासाठी, छोटे उद्योजकांना, महिलाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच आदिवासी समाजातील मच्छीमारी करणाऱ्या दुर्लक्षित उपेक्षित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तालुक्यातील मांडवगण या पाट पाणी पासून आणि विकासापासून कोसो दूर असलेल्या गावातील एक व्यक्ती श्री. विठ्ठलराव भाऊसाहेब वाडगे पाठीमागे सक्षमपणे उभे राहिले. ते ही निस्वार्थी वृत्तीने आणि गेल्या १० वर्षात शेतकरी, उद्योजक, छोटे उद्योजक, गृहप्रक्रिया उद्योग सुरू करणाऱ्या महिला, विद्यार्थी यांच्या मध्ये खऱ्या अर्थाने चैतन्य निर्माण केले. राजकीय दृष्ट्या प्रगल्भ असलेल्या श्रीगोंदा तालुक्यात रोटरी क्लब, लायन्स क्लब अशा संघटनांची कमतरता होती ती कमतरता विठ्ठलराव वाडगे यांनी दूर केली.

कोणताही राजकीय वारसा नसताना ,साधने अपुरी असताना आणि लहानपण गरीब घरात गेलेल्या आईच्या छत्राला लहानपणीच हरपलेल्या विठ्ठलराव वाडगे यांनी शिक्षण नंतर ग्रामविकास अधिकारी म्हणून केलेली नोकरी आणि पुढे तालुक्यात शेतकरी, शेतमजूर, हजारो महिलांना बचत गट द्वारे कर्ज, यातून तालुक्याला पुन्हा विकासाकडे नेण्यात केलेली कामगिरी निश्चितच आश्चर्य चकित करणारी आहे. त्यांच्या या यशाची भुरळ युवा आमदार विक्रम पाचपुते यांना देखील पडली आणि एका कार्यक्रमात त्यांनी याची प्रांजल कबुली देताना म्हटले की विठ्ठलराव वाडगे यांनी कसे यश मिळवले याचे मार्गदर्शन आपण घेणार आहोत.

श्रीगोंदा तालुक्याचे बागायत,जिरायत भाग आहेत घोड प्रकल्प खाली लाभक्षेत्रातील गावे, कुकडी प्रकल्प खालील गावे वगळता मांडवगण , घोगरगाव, बांगर्डे, कामठी, रुइखेल कोळगाव, चिखली, कोथुळ, ढोरजे आदी गावे पाट पाणी पासून वंचित आहेत. लहरी निसर्गाच्या सरीवर येथील शेती पिकते म्हणजेच अनिश्चितता. अशा गावात लहान पण विठ्ठलराव वाडगे यांचे गेले पण शिकण्याची जिद्द त्यांना ग्रामसेवक पदापर्यंत घेऊन गेली.

नोकरी निमित्ताने तालुक्याच्या मुख्यालयी पंचायत समिती मध्ये येत असताना सहकारी कर्मचाऱ्यांच्या अडचणींची माहिती मिळू लागली. आपण आतापर्यंत जगलेल आयुष्य इतरांच्या वाटेला येऊ नये त्यांची शासकीय कामात अडचण येऊ नये या हेतूने सेवा केली. कर्मचारी जोडले त्यांच्या सुखदुःखात भाग घेत सेवा काळ सुरू असताना जिवलग मित्र आजारी पडला असताना त्याला उपचार खर्चासाठी झालेली धावपळ विठ्ठलराव वाडगे यांना अस्वस्थ करून गेली आणि इथेच समाजातील दैन्य, गरिबी दूर करण्यासाठी काहीतरी सामाजिक कार्य करावे याची पेरणी झाली आणि स्वेच्छा निवृत्ती घेऊन १२ वर्षापूर्वी दौंड येथे वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीचे रोप लावले. आज त्याचा वेलू दूरवर गेला आहे.



वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटी श्रीगोंदाच्या ११ शाखा असून ठेवी सुमारे २८५ कोटी रुपये असून ३०० कोटी कडे वाटचाल सुरू आहे. वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी मार्फत छोट्या उद्योजकांना कर्ज दिले जाते तसेच सोने तारण कर्ज दिले जाते. सोन्याचे दर सातत्याने वाढत असताना त्यावर कर्ज रक्कम देखील वाढत आहे. वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी मध्ये सध्या प्रति तोळा ७६ हजार कर्ज दिले जात असून याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. प्रारंभी महिला बचत गटांची स्थापना करून बचत गट द्वारे महिलांना कर्ज दिले. पुढे चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था अहिल्यानगर येथे स्थापन केली. त्याचा कारभार वाडगे यांच्या पत्नी सौ. रुक्मिणीताई वाडगे या पाहत आहेत. स्नुषा सौ. सायली शुभम वाडगे या वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीचा कारभार पाहत आहेत. त्या उच्च विद्या विभूषित आहेत

चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था मार्फत दरवर्षी जून आणि दिवाळी पुर्वी प्राधान्याने कोट्यवधी रुपये कर्ज महिला बचत गटात दिले जाते. यामागील कारण देखील असे आहे की जून महिन्यात शेती कामाची लगबग असते तसेच मुलांचे शाळा प्रवेश, वह्या,पुस्तके, कपडे यासाठी रोख रकमेची गरज असते तसेच दिवाळीसणाच्या काळात खर्च असतो. वेगवेगळ्या मालाची खरेदी करावयाची असते.




दरम्यान काळात वर्षभर बचत गटाला कर्ज पुरवठा सुरूच असतो. प्रारंभी प्रति महिला १० हजार रुपये कर्ज घेणाऱ्या महिला आज रोजी १ लाख रुपये कर्ज घेत आहेत. सुमारे १७०० बचत गट द्वारे सुमारे १७ हजार महिलांनी कर्ज घेतले असून या सर्वांना दिवाळीत दिवाळीचे साहित्य देखील भेट स्वरूपात दिले जाते. इतर मायक्रो फायनान्स कंपन्यापेक्षा इथे जास्त सुविधा, माफक व्याजदर, प्रक्रिया उद्योगास चालना, आपुलकी यामुळे महिला वर्गात वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट आणि चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था बाबत समाधानाचे वातावरण आहे. कोरोना काळात काही फायनान्स कंपन्यांनी महिलांना दिलेल कर्ज वसुलीचा निर्णय घेतला. नवे कर्ज बंद केले जात होते. अशा वेळी लॉकडाऊन काळात विठ्ठलराव वाडगे यांनी नव्याने कर्ज देण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांचे असे म्हणणे होते की लॉकडाऊन किती काळ राहील माहीत नाही. आज महिला बचत गटांची अवस्था बिकट आहे. त्यांना पैशाची गरज आहे. आपण संकट काळी उभे राहिलो तर महिला भविष्यात कर्ज परत करतील. आज त्यांना मदत करणे गरजेचे आहे आणि झालेही तसेच या काळात सुमारे २ कोटी कर्ज वितरीत करण्यात आले. ठप्प पडलेली अर्थचक्र सुरू झाले. कालांतराने लॉकडाऊन काळ संपला आणि महिलांनी घेतलेले कर्ज अदा केले. माणुसकीतून विठ्ठलराव वाडगे या माणसाने घेतलेला निर्णय सार्थकी ठरला !

याच काळात सर्वाधिक म्हणजे सुमारे २ हजार एकरातील द्राक्ष मळे असल्याने श्रीगोंदा तालुक्यातील कॅलिफोर्निया समजला जाणारा पारगाव आणि परिसर लॉकडाऊन मुळे द्राक्ष विक्री तोट्यात करावी लागली. तत्पूर्वी नैसर्गिक आपत्ती मुळे उत्पादन घटले. कोरोना काळात बाहेरील व्यापाऱ्यांनी ८ ते १० रुपयांनी द्राक्ष खरेदी केल्याने द्राक्ष उत्पादक बागायतदार आर्थिक अडचणीत सापडला. त्याला बँका कर्ज देण्यास धजावत नसताना माणुसकीतून द्राक्ष बागायतदारांना देखील २, कोटी रुपये कर्ज दिले. आज या बागा दिमाखात उभ्या आहेत. यात वाडगे यांचे योगदान निश्चित असल्याचे येथील बागायतदार आवर्जून सांगतात. कोरोना काळात उपचारासाठी दाखल रुग्णांच्या नातेवाईकांना कर्मचाऱ्या मार्फत विठ्ठलराव वाडगे यांनी जेवणाचे डबे पोहोच केले. ग्रामीण भागात किराणा साहित्य पोहोच केले . स्वातंत्र्य मिळाल्या पासून शासन पातळी वर ७५ वर्ष आदिवासी विकासाच्या योजना आखल्या जात आहेत. पण तालुक्यातील घोगरगाव, तरडगव्हाण परिसरातील आदिवासी समाजातील मच्छीमार करणारी कुटुंबे विकासा पासून दूर आहेत. ही कुटुंबे वर्षातील ६ महिने मच्छीमार तसेच इतर दिवसात मोलमजुरी करून गुजराण करत होते. विठ्ठलराव वाडगे यांनी त्या कुटुंबांची भेट घेतली. कर्ज बाबत माहिती दिली. त्यांना महिला बचत गट स्थापन करून देण्यात आवश्यक कागद पत्र बाबत मार्गदर्शन केले. त्यांना मच्छीमारीसाठी आवश्यक साधने घेण्यासाठी कर्ज दिले. त्या महिलांनी मुदतीत कर्ज फेड केली. पुढेही कर्ज घेऊन आपले आर्थिक उत्कर्ष करत आहेत. हे सर्व निस्वार्थी वृत्तीने वाडगे यांनी केले.



श्रीगोंदा तालुक्यात ऊसा पाठोपाठ कांदा पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. पण कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्याचे दर मिळत नव्हते. अधिक दर मिळण्याच्या आशेपोटी शेतकरी पुणे, सोलापूर तसेच राज्याबाहेर कांदा पाठवत असे. पण काही वेळा पैसे बुडत अशी शेतकऱ्याची फसवणूक होत होती. त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण असे. विठ्ठलराव वाडगे यांनी यातून मार्ग काढण्याचे ठरवले. हेतू एकच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचे दाम मिळावेत. शासनाच्या मॉडेल अँक्ट नुसार त्यांनी खाजगी बाजार समिती उभारण्याचा निर्णय घेतला आणि नगर दौंड राजमार्गावर पारगाव फाटा येथे ओम चैतन्य मल्टी अँग्रो पर्पज को ऑपरेटिव्ह लिमिटेडचे चैतन्य कृषी उत्पन्न बाजार समिती खाजगी तत्वावर सुरू केली. या बाजार समितीचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व प्रथम मालाचे वजन केले जाते,महानगर धर्तीवर लिलाव पुकारला जातो म्हणजेच दर जास्त मिळतो आणि मालाचे पैसे म्हणजेच आडत्या आणि शेतकऱ्यांच्या भाषेत पट्टी लागलीच दिली जाते. ती देखील शेतकऱ्यांच्या खात्यावर ! त्यासाठी बाजार समितीच्या शेजारीच वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीची शाखा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकचे दाम लागलीच मिळत आहेत. त्यामुळे इथे कांदा मोठ्या प्रमाणावर शेतकरी आणत आहेत.






आठवड्यातून ३ दिवस लिलाव होतात. श्रीगोंदा तालुका तसेच शेजारील तालुक्यातून देखील इथे कांदा मोठ्या प्रमाणावर येतो. याशिवाय भुसार, कडधान्य, चिंच, फळे, टोमॅटो, लिंबू विक्री देखील सुरू करण्यात आली होती. भविष्यात सर्व धान्य, कडधान्य, फळे खरेदी विक्रीचा समितीचा मानस आहे या बाजार समितीत विठ्ठलराव वाडगे यांचा मुलगा शुभम वाडगे कारभार पाहत आहे.



तालुक्यात शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, स्पर्धापरीक्षा, सीए, वैद्यकीय आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी मार्फत केला जातो. ८ मार्च अर्थात महिला दिनाचे औचित्य साधून राजकीय, शासकीय सेवेतील महिला अधिकारी यांच्या उपस्थितीत मेळावा आयोजित करण्यात येतो. त्यात कर्ज वाटप देखील केले जाते. महिलांच्या आरोग्य आणि कायदेशीर अधिकार बाबत मार्गदर्शन आणि शिबिराचे आयोजन करण्यात येते. विठ्ठलराव वाडगे यांच्या कार्याची दखल घेत राज्य सहकारी मंडळाने गौरव केला. राज्य स्तरीय प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सहकार मंडळाचे संचालक विनीत नारायण यांनी वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी आणि बाजार समितीला भेट देऊन खऱ्या अर्थाने शासन आणि सहकार मंडळाला अभिप्रेत महिला सक्षमीकरण आणि उद्योजक घडविण्याचे तसेच शेतकऱ्यांची चिंता वाहणारी कामे विठ्ठलराव वाडगे यांनी केले असल्याचे गौरवोद्गार काढले होते.

शेतकरी मग तो कांदा उत्पादक असो की द्राक्ष, लिंबू, भुसार तसेच महिला उद्योजिका,शेतमजूर, छोटे उद्योजक, विद्यार्थी अशा सर्वांच्या जीवनात चैतन्य निर्माण करण्याचे मोठे कार्य विठ्ठलराव वाडगे सतत करत आहेत. याशिवाय गोशाळा, आश्रम शाळा यांना मदत केली जाते. सतत भ्रमंती वर राहून श्रीगोंदा तालुक्यात काय नवीन आणता येईल त्यातून बेरोजगारांना कसा रोजगार मिळेल आपल्या तालुक्यातील कृषी मालावर प्रक्रिया करून कुठे बाजारपेठ मिळवता येइल याचाच विचार कोणताच स्वार्थ न ठेवता ही व्यक्ती करत आहे.

शासनाने मल्टीस्टेट सोसायटीना आरोग्य क्षेत्रात उतरण्याचे आवाहन केले. त्याला अनुसरून विठ्ठलराव वाडगे यांनी अल्प दरात सर्व सुविधा युक्त रुग्णालय उभारण्याचे ठरवले असून या क्षेत्रात देखील ते यशस्वी ठरतील यात शंका नाही.

आज रोजी श्रीगोंदा तालुक्यातील विकासाची घोड दौड अखंडित ठेवण्यासाठी विठ्ठलराव वाडगे,त्यांच्या पत्नी सौ. रुक्मिणीताई आणि मुलगा शुभम, स्नुषा सौ. सायली शुभम वाडगे असे पूर्ण कुटुंब योगदान देत आहेत.




ADVT




# वारी..!!

**शंतनूला प्रवास करण्याची, वेगवेगळी शहर, हिलस्टेशनवर जाण्याची खूप आवड होती, छंद होता आणि लग्न झाल्यापासून असा एकही वीकएंड गेला नव्हता की तो शरयूला, बायकोला घेऊन बाहेर फिरायला गेला नव्हता आणि आज पहिल्यांदाच शरयूमुळे वीकएंड्ला त्याच्यावर घरी रहायची वेळ आली होती ! आणि याच कारणावरुन तो चिडला होता व त्याची रात्री शरयूशी मोठी वादावादी झाली होती.**

शंतनु अरे तुला सांगायचं राहीलच. रात्री बेडवरच पांघरुण झटकत शरयू म्हणाली.. उद्याच्या शनिवार रविवारी आपण कुठेही फिरायला जाणार नाही आहोत. उद्या परवा आपल्याला पंढरपुरच्या आषाढी वारीला जायचय.. आपल्या भागातल्या नगरसेवकानी सर्व व्यवस्था केलीय आणि सोसायटीतील मी आणि अजून चार पाच तरूण कपलस् नी आपली नाव त्यांच्याकडे दिली आहेत. विठ्ठलाच्या कृपेने किती छान योग आला आहे ना.! लहानपणापासून शरयू प्रचंड भाविक आणि श्रद्धाळू होता. सोमवारी महादेव, बुधवारी विठ्ठल आणि गुरूवारी दत्त मंदिरात जाऊन दर्शन घेतल्यावर शिवाय ती जेवण करीत नसे. शंतनूचं मात्र याच्या उलट होत. आयुष्यात जे काहीं होत असत, ते आपल्या पूर्वकर्माचं फळ असतं आणि ते कोणताही देव आला तरी बदलू शकत नाही हा त्याचा आवडता सिद्धांत होता आणि देवधर्म पूजाअर्चा यावर त्याची श्रद्धा नव्हती आणि आता शरयू त्याला पंढरपूरच्या वारीला घेऊन जायला निघाली होती.! वारी..? काय वेडबिड लागलयं का तुला ? चांगला वीकएंड एंजॉय करायचा सोडून हे काय खूळ तू काढलयं. आणि तुला माहित आहे ना मला देवदर्शन, यात्रा जत्रा अशा गोष्टीत अजिबात इंटरेस्ट नाही म्हणून. आपण बाहेर फिरायला गेलो तरी मी कुठल्याही गावातल्या प्रसिद्ध मंदिरात वगैरे जात नाही तू बघितलय. मी नाही येणार वारीबिरीला..! शंतनू प्रचंड वैतागला होता.

हे बघ शंतनू आजपर्यंत आपण इतक्यावेळा कुठे कुठे फिरायला गेलो.. मला आवडो व आवडो मी एकदातरी तुला येत नाही म्हटलयं का ? मग आता माझ्यासाठी तुला एक दिवस तेही काही तास वारीला यायला काय हरकत आहे ? आणि आपल्याला लोणंद ते तरडगाव या वारीच्या एका टप्प्यात म्हणजे दहा पंधरा किलोमीटर पालखीबरोबर चालायचं आहे आणि विठ्ठलाचे चरणी आपली सेवा रूजू करायची आहे.. शरयू त्याचा हात हातात घेत म्हणाली.

शंतनू काहींसा वरमला होता. तिनं आजपर्यंत त्याच मन कधीही दुखावलं नव्हतं हे खरं होतं पण तिच्यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालून टाळ वाजवत रस्त्यानं चालत जायला त्याच मन अजून तयार नव्हतं. पण शरयूला नाही म्हणायला त्याला काहीं कारणही सुचत नव्हतं. हे बघ मी तुला एकदाच सांगितलय मी वारीला येणार नाही म्हणजे नाही. उगीच वाद घालू नकोस. तुला जायचं असेल तर तू एकटी जाऊ शकतेस. शंतनू आता एकेरीवर आला होता. ठीक आहे बाकीचे सगळे जोडीने असताना मी मात्र एकटी जाईन पण सोसायटीत तुझी इमेज राहील याचा विचार. वाद वाढायला लागलेला पाहून दोघांनीही आवरत घेतलं आणि एकमेकांकडे पाठ करून ते झोपी गेले.



लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच दोघात एवढी वादावादी झाली होती. त्यामुळे रात्रभर शंतनूला नीट झोप लागली नव्हती.

आणि सकाळी बेडवर पडल्या पडल्या रात्रीचा हा प्रसंग त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला. शंतनूनं अंगावरच पांघरुण बाजुला केलं आणि उठून तो किचनकडे निघाला. शरयू ओट्याजवळ उभा राहून बहुधा चहाच करत होती. मोबाईलवर कानडा राजा पंढरीचा..

हे भक्तीगीत लावलेलं होतं आणि ती तितक्याच भक्तीभावाने ते ऐकत होती. शंतनूनं तिच्याजवळ जाऊन तिचा हात हातात घेतला शरू..रात्री मी थोडसं जास्तच जोरात बोललो..आय एम रिअली सॉरी पण.... त्याच ते वाक्य अर्धवटच राहिलं आणि त्याच्या फोनची रिंग वाजायला लागली. तो ग्वाल्हेरला असलेल्या त्याच्या जिवश्चकंठश्च मित्राचा, पवनचा कॉल होता. शंत्या..कुठे पुण्यातच आहेस की गेलायस कुठे उंडरायला ? शंतनूनं घरीच आहे असं सांगितलं.

बरं झालं बाबा..हे बघ मी संध्याकाळच्या फ्लाइटनं पुण्याला येतोय तुझ्याकडे ! तुला माहित नाही मागची पाच वर्षे मी आणि माझी बायको आषाढी वारीसाठी पुण्याला येतोय. तुला धार्मिक गोष्टींची आवड नाही हे मला माहित आहे त्यामुळे तुला सांगितलं नव्हतं. पुण्यात धोडपकर म्हणून माझा मित्र आहे त्याचा वारी करणारा एक मोठा गृप आहे त्यांच्याबरोबर मी जात असतो. वारीमध्ये टप्पे असतात त्यातील लोणंद ते तरडगाव हा दहा बारा किलोमीटरचा टप्प्यत मी पालखीबरोबर सहभागी होत असतो. नेमकी काल ही आजारी पडली. वारी चुकवायचं माझ्या जिवावर आलं होतं आणि का कुणास ठाऊक माझ्या मनात आलं की यावेळी तुला आणि वहिनींना वारीला घेऊन जायचं.

अरे पण..शंतनूनं शेजारीच कपात चहा ओतता ओतता फोनवरचं त्यांच बोलणं ऐकत असलेल्या शरयूकडे पाहिलं..ती गालातल्या गालात हसत होती! पण बिण काहीं नाही..मी तुमच्या दोघांच नाव माझ्याबरोबर गृपवर नोंदवलय आणि आपल्याला जायचयं ! एकदा बघतरी तिथ कसं प्रसन्न आणि भक्तीमय वातावरण असतं ते..! आणि शंतनू कांही बोलायच्या आत त्यानं फोन कट करून टाकला होता.

शंतनूनं शरयूकडे एक दृष्टीक्षेप टाकला आणि दोघही आता हसायला लागली !

मी रात्री वारीला जायचं म्हणून म्हटलं तर माझ्याशी भांडायला लागलास आणि आता मित्रापुढे मात्र गप्पगार ! चहाचा कप त्याच्यापुढे ठेवत शरयू लटक्या रागानं म्हणाली. शंतनू मात्र आश्चर्यचकित झाला होता. काल शरयूनं वारीच्या ज्या टप्प्यात सहभागी व्हायच म्हणून सांगितलं, त्याच टप्प्यात सहभागी होण्यासाठी त्याला आज पवनचा फोन आला होता इतकचं नाही तर त्यानं गृपवर त्यांच नावही नोंदवून टाकलं होतं. हा केवळ योगायोग आहे की एखादा दैवी संकेत आहे असा पुसटसा विचार त्याच्या डोक्यात येऊन गेला पण त्यानं तो लगेच झटकून टाकला ! शरू.. तुमच्या दोघांपुढे माझा नाईलाज झाला आहे. ठीक आहे मी येतो पण मी तेथे गळ्यात तुळशीची माळ आणि कपाळावर बुक्का वगैरे लावणार नाही हे आत्ताच सांगून ठेवतो..मी फक्त तुम्हाला कंपनी म्हणून येणार. अरे.. मी कुठे म्हणतेय तुला तिथे तुळशीची माळ घाल म्हणून! मी पण तुला फक्त बरोबर चलं म्हणतेय. आता ते जाऊ दे पण माझं एक काम कर. माझ्यासाठी आणि पवन भावजींसाठी दोन तुळशीच्या माळा आणि वाजवायचे टाळ तेवढे कोणत्याही परिस्थितीत संध्याकाळपर्यंत आणून दे. उद्या आपल्याला लवकर निघायचय. मला आज कामं आहेत त्यामुळे वेळ नाही. शरयू उत्साहाने म्हणाली. नवरा वारीला यायला तयार झाला याचाच तिला जास्त आनंद झाला होता! दुपारी शंतनूनं बाईक काढली आणि तो तुळशीच्या माळा घेण्यासाठी निघाला. दगडूशेठ गणपती मंदिराजवळ धार्मिक वस्तूंची दुकान आहेत तिथं या वस्तू सहज मिळतील म्हणून तो तिकडे निघाला पण तिथे त्याला तुळशीची माळ काहीं मिळाली नाही. त्यानंतर पुण्यातल्या सगळ्या प्रसिद्ध मंदिराजवळची धार्मिक दुकान त्यानं बघितली पण कुठेही तुळशीची माळ मिळायला तयार नव्हती.

त्याला आता आश्चर्य वाटायला लागलं. माळा आणि टाळ नेणं आवश्यक होतं नाहीतर 'एवढी साधी गोष्ट पण तू करू शकत नाहीस.. हा शरयूचा डायलॉग त्याला ऐकून घ्यावा लागणार होता. शेवटचा एक प्रयत्न म्हणून कंटाळून तो पेठेतल्या विठ्ठल मंदिराजवळ आला आणि तिथल्या दुकानदाराकडे तुळशीची माळेची चौकशी केली.

दुकान बंद करता करता तो म्हणाला साहेब तुम्हाला तुळशीची माळ सध्या पुण्यात कुठेही मिळणार नाहीत. परवा पुण्यात दोन्ही पालख्या येऊन गेल्या त्यादिवशीच पुण्यातल्या सगळ्या दुकानाकडच्या तुळशीच्या माळा आणि इतर वस्तू संपून गेल्या आहेत. आता नवीन यायला निदान दोन दिवस तरी लागतील.

तुळशीची माळ कुठेही न मिळण्याचं कारण आता त्याच्या लक्षात आलं. निराश होऊन त्यानं बाईक स्टार्ट केली. इतक्यात अंगात मळकट पांढरा शर्ट, खांद्यावर राम कृष्णहरी लिहलेली पिशवी लटकवलेली आणि कपाळावर उभा टिळा असलेला एक काळासावळा गृहस्थ मंदिरातून त्याच्याकडे येतांना दिसला. आणि त्याच्या हातात तुळशीच्या माळा असलेली प्लॅस्टीकची पिशवी लटकत होती. साहेब मी तुमचं बोलणं ऐकत होतो. तुम्हाला तुळशीच्या माळा पाहिजेत ना..ह्या घ्या. त्यानं हातातल्या पिशवीतील दोन माळा काढून त्याच्या हातावर ठेवल्या.! शंतनू आश्चर्यचकीत झाला होता !

ज्या माळा घेण्यासाठी तो गेले दोन तास गावभर फिरत होता त्या त्याच्या समोर होत्या. अहो, पण काका तुम्हाला लागणार नाहीत का या माळा ? तुम्ही तर वारकरी दिसताय ! आणि याचे पैसे किती द्यायचे.

साहेब तुम्हाला किती द्यायचे तेवढे द्या. माझं वारीला जायच रहित झालयं..दुसरं महत्वाचं काम निघालय.. माळा शंतनूच्या हातावर ठेवत ते म्हणाले. शंतनूनं माळा घेतल्या आणि पैसे देण्यासाठी खिशात हात घातला. खिशात पाचशेची नोट होती. थँक्यू काका, दोन मिनिट थांबा..मी नोट सुटी करून आणतो.शंतनूचा मोठा प्रश्न सुटला होता. घाईघाईने जवळच्या दुकानात जाऊन तो सुटे पैसे घेऊन आला आणि काय आश्चर्य..! ते गृहस्थ कुठेच दिसत नव्हते. त्यानं आजूबाजूला पाहिलं पण त्यांचा कुठेही मागमूस नव्हता!

पैसे न घेताच ते नाहिसे झाले होते ! शंतनूला आज हा आणखी एक धक्का बसला होता. आज सकाळपासून काहीं वेगळंच घडत होतं. अघटित घडत होतं ! आधी त्याच्या मित्र पवन त्याची इच्छा नसताना त्याला पंढरपुरच्या वारीला घेऊन चालला होता आणि आता पागोटे घातलेला हा काळासावळा गृहस्थ तुळशीच्या माळाचे पैसै न घेताच अदृष्य झाला होता. कुठलीतरी अज्ञात शक्ती त्याला वारीकडे पंढरपुरच्या विठ्ठलाकडे खेचीत होती, त्याच्या अधर्मिकत्वाला तडे देत होती, आव्हान देत होती !त्याच विचारांच्या चक्रव्युहात अडकलेला शंतनू घरी जाण्यासाठी परत निघाला. पवन बरयाच वर्षानी येत असल्यामुळे येता येता चितळेकडून श्रीखंड विकत घेतलं आणि वाटेत ट्रॅफिक लागल्यामुळे त्याला घरी पोहचेपर्यंत उशीर झाला होता.

शरयूनं दार उघडलं. अरे किती उशीर ? साध्या तुळशीच्या दोन माळा आणायला एवढा वेळ..मी फोनच करणार होते तुला.

शंतनू काहीं बोलला नाही. त्यानं आणलेल्या तुळशीच्या दोन माळा आणि टाळ तिच्या हातात दिले.

काय झालं सिरियस दिसतोस? बरं नाही का ?

आणि हो एक सांगायचय.. आत्ताच संतसाहित्य प्रचारक मंडळाचे एक काळेसावळे आणि कपाळावर उभा टिळा लावलेले गृहस्थ तुला भेटायला आले होते ! काळेसावळे आणि उभा टिळा लावलेले ? काय म्हणतेस ? शंतनू जागेवरून उडालाच ! हो ..तू सोसायटीचा सेक्रेटरी आहेस ना..त्यांना तुला भेटायचं होत. त्यांनी सोसायटीत वाटण्यासाठी 'हरिपाठा'च्या अभंगाच्या पुस्तिका आणल्या होत्या. तू भेटला नाहीस म्हणून त्या माझ्याकडे ठेऊन गेले आहेत. शंतनू अरे आपण वारीला जायचं ठरवलं आणि आज हरिपाठाचे अभंग न मागता आपल्या घरी आले ! खरचं देवा विठ्ठला तुझी कृपा अगाध आहे ! शरयूनं भक्तिभावाने आपले हात जोडले. शंतनू आता उतावीळ झाला होता. कुठायत ती पुस्तकं? ती काय प्लॅस्टीकच्या पिशवीत सेंटर टेबलवर ठेवलीत.. शरयू म्हणाली. शंतनू अधीरपणे टेबलजवळ गेला ! ज्या प्लॅस्टिकच्या पिशवीतून आणलेल्या तुळशीच्या माळा त्या काळ्यासावळ्या गृहस्थानी त्याला दिल्या होत्या तशाच पिशवीत हरिपाठाची पुस्तक टेबलंवर ठेवलेली होती ..!!

शंतनूच अंग शहारून आलं होतं. डोळे अश्रूनी डबडबले होते. त्याच्या अहंकाराचा श्रद्धाभक्तीच्या पवित्र भावनेनं आज पराभव केला होता ! त्यानं अभावितपणे काळ्यासावळ्या रंगाच्या आणि कपाळावर उभा टिळा लावलेल्या त्या अनामिक देवदूताला हात जोडले आणि आपले डोळे मिटून घेतले.!! आणित्याच्या डोळ्यासमोर त्या अनामिक 'देवदूता'च्या जागी प्रसन्न चेहरयाची, कमरेवर दोन्ही हात ठेवलेली विठ्ठलाची काळीसावळी मनोहर मुर्ती दिसायला लागली होती..!!!

- कृष्णकेशव.











# लोकमान्य टिळक व सोलापुरकरांमधील जिव्हाळा

**भारतीय राष्ट्रवादाचे एक जनक, स्वातंत्र्य चळवळीचे एक प्रमुख शिल्पकार, धैर्यमेरु लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे सोलापुरातील अनेक व्यक्तींबरोबर जिव्हाळ्याचे व घनिष्ट संबंध होते. टिळक अनेकवेळा सोलापुरात येऊन गेले. सोलापुरातील वकील, डॉक्टर्स, पत्रकार, व्यापारी सामान्य जनता टिळकांच्या जाज्वल्य देशभक्तीमुळे त्यांच्यातील नेतृत्वगुणांमुळे व निस्सिम, त्यागीवृत्तीमुळे भारावून गेलेली होती. हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन, जगन्नाथ मोरेश्वर सामंत वकील, 'स्वराज्य' साप्ताहिकाचे संपादक बळवंत शंकर लिमये, कर्मयोगी साप्ताहिकाचे संपादक रामभाऊ राजवाडे, जगन्नाथ (मास्तर) परदेशी, पहाडी आवाजात वंदेमातरम म्हणणारे श्रीनिवास काडगावकर हे लो. टिळकांचे भक्त होते. बंडप्पा काडादी, शेठ गुलाबचंद हिराचंद, रावसाहेब निंबर्गीकर, बंकटलाल सोनी आदी प्रमुख व्यापारी लोकमान्य टिळकांचे चाहते व अनुयायी होते. पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांना तर टिळक जीवलग मित्रच मानत होते.**

सोलापूर नगरपालिकेने केलेल्या कर वाढीविरुध्द सोलापुरात आंदोलन करण्याचे आण्णाराव वजीरकर, मल्लिकार्जुन पसारे आदी मंडळांनी ठरविले होते. त्यासाठी लो. टिळकांना आमंत्रित केले गेले. या करवाढीच्या निषेधार्थ बाळीवेशीजवळील मल्लिकार्जुन मंदीराजवळ २५ ऑक्टोंबर १८८१ रोजी लो. टिळकांची जंगी सभा झाली. या सभेत लो. टिळकांनी नगरपालिकेच्या अंदाजपत्रकाची छाननी करुन काटकसरीने कारभार केल्यास आणि अनावश्यक खर्च टाळल्यास करवाढीची आवश्यकता नसल्याचे सप्रमाण दाखवून दिले. परिणामी सोलापूर नगरपालिकेस करवाढ रद्द करावी लागली.

सन १८९०-९१ मध्ये संमती बिलाच्या विरुध्द भाषण करण्यास आप्पासाहेब वारदांनी टिळकांना सोलापुरात बोलाविले होते. १८९६ साली टिळकांनी व वारदांनी सोलापूर जिल्हयातील दुष्काळ निवारणाची सहकारी पध्दतीची योजना ब्रिटीश सरकारपुढे मंजुरीसाठी ठेवली होती. पण सरकारने काहीही सहकार्य करण्यास व जबाबदारी घेण्यास नकार दिल्यामुळे ही योजना फलद्रुप झाली नाही.

सन १८९७ साली 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे' या केसरीतील दोन अग्रलेखांबद्दल टिळकांवर ज्यावेळेस पहिला राजद्रोहाचा खटला भरण्यात आला होता. त्यावेळेस आप्पासाहेब वारदांनी सोलापुरातील एक श्रीमंत गृहस्थ मल्लिकार्जुनअप्पा पसारे यांचे पुण्यातील मेहुणे व एक सधन व्यापारी उरवणे शेठ यांचा लो. टिळकांना जामीन मिळवून दिलेला होता. स्वदेशीच्या प्रचारार्थ कापड गिरण्या काढण्याचे आवाहन त्यांनी अनेकांना केले होते. त्यानुसार आप्पासाहेब वारदांनी राजाबहादूर ग्यानगिरजी यांच्या सहकार्याने कापड गिरणी सोलापुरात सुरु केली. सुरुवातीला ती वारद मिल म्हणून आणि पुढे नरसिंग गिरजी मिल म्हणून ओळखली जात होती. बंडप्पा काडादी यांनी १९१० साली विजापुरात जिनिंग फॅक्टरी सुरु केली. अशाप्रकारे टिळक हे सोलापुरातील व सोलापूर बाहेरील कापड उद्योगाचे प्रेरणास्रोत होते. लो. टिळकांच्या पैसा फंडास व त्यांच्या चळवळीस वारदांनी भरभरुन आर्थिक मदत दिली होती. टिळक १९०८ साली तळेगावच्या राष्ट्रीय विद्यालयाकरीता निधी जमवण्यासाठी सोलापुरात आले असताना वारदांनी ४१०० रुपयांची देणगी दिली होती. त्याकाळात सोलापुरकरांनी एकूण १९००० रुपये गोळा करुन टिळकांना दिलेले होते. सोलापुरातल्या श्रध्दानंद समाजाच्या आजोबा गणपतीच्या उत्सवातही लो. टिळक सहभागी झाले होते. टिळक ज्या ज्या वेळी सोलापुरात यायचे त्या त्या वेळेस त्यांचा मुक्काम वारदांच्या घरीच असायचा आणि ज्या ज्यावेळी वारद पुण्यास उन्हाळ्यात सिंहगडावर हवापालट करण्यास जात होते त्यावेळी बऱ्याचदा ते लो. टिळकांसोबत रहात होते. १९ जानेवारी १९११ रोजी आप्पासाहेब वारदांचे निधन झाले आणि त्यांच्या निधनाची बातमी जेव्हा लो. टिळकांना मंडालेच्या तुरुंगात असताना समजली तेव्हा त्यादिवशी त्यांनी अन्नग्रहण केले नव्हते. एवढा जिव्हाळा आप्पासाहेब वारद व लोकमान्य टिळकांमध्ये होता. टिळकांनी वारदांचे कार्यकर्तृत्व आणि नावलौकिक पाहून त्यांचा एका पत्रात पुण्यश्लोक असा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला होता.



सोलापुरातून प्रसिध्द होणाऱ्या स्वराज्य साप्ताहिकाचे संपादक बळवंत शंकर लिमये यांना १९०७ साली सुरतेच्या राष्ट्रीय सभेत जहाल व मवाळ यांच्या गटात झालेल्या हाणामारीच्या प्रसंगी लो. टिळकांचे शरीर संरक्षक होण्याचा मान मिळाला होता. १९०८ साली टिळक सोलापुरात आले असताना त्यांचे खाजगी सचिव म्हणून लिमये यांनी काम केले होते. १९०८ साली लो. टिळकांनी राजद्रोहाच्या खटल्यात ६ वर्षाची शिक्षा न्यायालयाने ठोठावल्याबद्दल जगन्नाथ मोरेश्वर सामंत वकिलांनी त्या निर्णयावर प्रखर टिका केली होती त्याबद्दल सामंतांनी माफी मागावी अशी न्यायालयाची अपेक्षा असताना त्यांनी ती धुडकावून लावली त्याबद्दल त्यांची वकिलीची सनद सहा महिन्यांसाठी तहकूब ठेवण्यात आली होती.

पंढरपुर येथे १६ नोव्हेबर १९०७ रोजी चंद्रभागेच्या वाळवंटात सुमारे १५ हजार लोकांसमोर स्वदेशी या विषयावर लो. टिळकांचे भाषण झाले होते. या भाषणात त्यांनी आपल्याजवळ शस्त्रे नाहीत पण स्वदेशी व्रताचे अवलंबन हा एकच उपाय आहे. स्वदेशी व्रताबद्दल शपथ घेण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित जनसमुदायाला केले. २८ फेब्रुवारी १९०८ रोजी लो. टिळकांचे श्री. सिध्देश्वर मंदीराच्यासमोरील मंडपात 'राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. या भाषणात लोकमान्य म्हणाले की शिक्षण मिळाल्यावर विद्यार्थ्यांमध्ये पोट भरण्याची ताकद आली पाहिजे. हे सर्व शिक्षण मुलांना सुलभरीतीने देता येईल अशी तजवीज केली पाहिजे. मुलांना देशस्थितीचे ज्ञान वयाच्या पंधराव्या वर्षापासून झाले पाहिजे. देश खाली चाललेला वर उचलण्याची ताकद व धैर्य, जोम यावा याकरीता राष्ट्रीय शाळा पाहिजेत. अशा गोष्टींचा समावेश ज्या शिक्षणात होतो ते राष्ट्रीय शिक्षण होय. शिक्षणक्रमातील दोष काढण्यासाठी शिक्षणक्रम सरकारच्या दडपणातून मुक्त करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षणसंस्था काढणे जरुरीचे आहे ही लो. टिळकांची अपेक्षा आजसुध्दा सरकारकडून पूर्ण झालेली नाही. याच भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना व देशवासियांना राष्ट्रोध्दाराच्या कामात झोकून द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. याचदिवशी लो. टिळकांचे 'स्वदेशी संस्था' या विषयावर तर २९ फेब्रुवारीस 'लष्करात सद्यस्थिती' या विषयावर सोलापुरात व्याख्यान झाले. टिळकांची बार्शी आणि पंढरपूर येथेही भाषणे झालेली होती.



प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर

सोलापूर

९४२०३५७२७०


लोकमान्य टिळकांची जनआंदोलनाशिवाय व संघटित चळवळीशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही अशी ठाम धारणा झालेली होती. होमरुल चळवळीस नेमस्तांचा विरोध होता. लोकही होमरुलच्या विरोधात आहेत असा समज नेमस्तांनी करुन घेतला होता. त्यांनी तसा प्रचारही सुरु केला होता म्हणून हा प्रचार खोडून काढण्यासाठी १९२० साली सोलापुरात प्रांतिक परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस साहित्य सम्राट न. चिं. केळकर, ल.ब. भोपटकर, गंगाधर देशपांडे अशी दिग्गज मंडळी उपस्थित होती. समारोपास लो. टिळक हजर होते. त्यांची लोकांनी सजविलेल्या रथातून मिरवणूक काढली. नेमस्तांनी ही परिषद उधळण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा हा डाव सफल झाला नाही. या परिषदेतून लढाऊ व आक्रमक राजकारणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. यातून भाई एम.डी. विभुते, डॉ. भाऊकाका अंत्रोळीकर, देशभक्त तुळशीदास जाधव, भाई छन्नुसिंग चंदेले असे लढाऊ नेते पुढे आले. या परिषदेच्यावेळी लो. टिळकांचा ढोर तसेच चांभार समाजाने त्यांच्या गल्लीत सत्कार केला. त्या प्रसंगी टिळकांनी मार्गदर्शनपर भाषणही केले. लोकमान्य टिळकांच्या प्रभावामुळे हुतात्मा अब्दुल रसुल कुर्बान हुसेन यांनी १९२७ साली सुरु केलेल्या आपल्या साप्ताहिकाचे नाव 'गजनफर' म्हणजे केसरी किंवा सिंह असे ठेवले होते. यावरुन त्यांच्यावर असलेला लो. टिळकांचा प्रभाव लक्षात येतो. या सर्व घटनांवरुन लो. टिळकांचा सोलापूरकरांवरील प्रभाव व सोलापूरकरांचे त्यांच्याशी किती जिव्हाळ्याचे संबंध होते हे स्पष्ट होते.

---

# सोलापूरच्या विकासात साहित्य क्षेत्राचे संस्कारक्षम योगदान

**हा विषय सोलापूरच्या विकासासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे कारण साहित्य आणि समाज हे एकमेकास पूरक असतात.ललित साहित्याने समाज घडतो आणि समाजाचे प्रतिबिंब ललित साहित्यात पडते. म्हणजेच समाजात ज्या काही समस्या असतात त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणारं, प्रयत्नशील असणारे , विधायकतेला प्रेरणा देऊन विधायक बदल घडवणार महत्त्वपूर्ण माध्यम म्हणजे साहित्य आहे. साहित्य या विभागामध्ये आपल्याला अनेक कलाकृतींच्या माध्यमातून लोकांच्यापर्यंत पोहोचवून लोकांच्या मनाला जागं करणं महत्त्वाचं असतं. लोक समूहाचं मन अगोदर व्यवस्थित तयार करून घेण्यासाठी वैचारिकतेने मूलगामी तत्व देणं महत्त्वाचं असतं. ही वैचारिकता देण्यासाठी समाजाला त्या लेखकांना प्रामाणिक राहून प्रथम समस्या समजून घ्यावी लागते. जेव्हा ती समस्या मुळापासून समजून घेतो तेव्हाच तो त्या समस्यांना न्याय देऊ शकतो. त्याच्यावर उपाय शोधू शकतो आणि ते उपाय लोकांच्यापर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था, माध्यमं आहेत ते माध्यम म्हणजे ललित साहित्य कला होय ! आज वृत्तपत्रे ही भूमिका निभावताना दिसतात. इलेक्ट्रानिक्स प्रसार माध्यमांनीही यासाठी आणखी योगदान द्यायला हवे. कारण आजच्या युगात वाचनसंस्कृती वाढते आहे ती या प्रसारमाध्यमांमधून !**

या ललित साहित्य कलेच्या माध्यमातून लोकांना शहाणं समजदार बनवून त्या समस्येवरती उपाय सुचवून तो कृतीतून आणण्यास समर्थ ठरते म्हणून यासाठी पुर्व परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य हे प्रभावी माध्यम आहे. लोकसाहित्य व लोककलांची यासाठीच निर्मिती झाली आहे. यामुळे लोकसाहित्याचा वापर आवश्यकता असेल तिथं आवश्य करावा म्हणजे लोकभाषेसह लोकांसाठी लोकरुचीनुसार लेखकाने अभिव्यक्त झाले पाहिजे. साहित्य हे लोकांचं झालं पाहिजे लोकांच्या अडचणी, प्रश्न समजून घेऊन लोकांना विश्वासात घेऊन समस्या नीट अकलित करून देण्याचे कार्य लेखकांने केलं पाहिजे .

साहित्यशास्त्रात याचा अनेक साहित्य मीमांसकांनी विचार केलेला आहे. म्हणूनच या संदर्भाचा अंधार घेता ललित साहित्य हे लोकांना आपलं वाटतं आहे हे दिसून येते. लोकाभिमुख साहित्य लोकं स्वीकारतात आणि इथूनच जगण्याची एका विशिष्ट रचनाबंधामुळे एक दिर्घ व्यवस्था/सिस्टीम तयार होते आणि मग ते रूढ होऊन लोकांच्यामध्ये प्रचलित होते . समाज विकासाचा अतिशय महत्त्वाचा असा हा टप्पा आहे. आणि मग ते रुढ झालेला समाजमानाने स्वीकारलेला व्यवस्थेचा भाग जीवनशैली बनवते आणि म्हणून जीवनशैली बनवण्यासाठी साहित्याने सदैव सक्षम, समर्थ ,प्रामाणिक, विश्वासार्हता देणारच साहित्य लिहिलं पाहिजे. यामध्ये सर्वांना सोपे सहज कळणा-या ललित साहित्य कलेचाच इथं उपयोग केला जातो. यामध्ये प्रभावीपने उपयोग केला जातो तो कवितेचा. कविता तिच्या गेयतेमुळे आणि तिच्या रचनाबंधामुळे लोकांना ते काव्य अतिशय भावलं जाणार हृदयस्पर्शी असं गीत बनते.ते गीत लक्षात ठेवायला आणि समजून घ्यायला सोपं असते . म्हणून लोकसाहित्यापासून ते आजतागायत कविता, गीतं प्रभावी ठरली आहेत. उदा. लोकरुढ झालेली गीतं व्यवहारात बोलताना प्रभावी संवाद म्हणून उपयोगी येतात. तसेच म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, कथेचे दाखले नक्कीच समाज माध्यमातून समाज मन बनविण्यासाठी प्रभावी ठरतात. ही भाषिक संस्कृती साहित्य समृद्ध करते. माध्यमातून प्रभाव टाकते यांचा प्रत्यय वारंवार येतो.

या पाश्र्वभूमीवर सोलापूरचा इतिहास पाहता असे दिसते की, आपण नेहमी सोलापूरने स्वातंत्र्य पुर्व काळात साडेतीन दिवस स्वातंत्र्य उपभोगले होते हे अभिमानाने सांगतो. परंतु हे कसं शक्य झाले याचा कधी विचार केला आहे का... ? मी जेव्हा संशोधनाच्या निमित्ताने ,' राष्ट्रीय कवी कुंजविहारी ' यांच्या चरित्राचा शोध घेत गेले तेव्हा या स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय कवी कुंजविहारींचा सहभाग व योगदानाबद्दल अभ्यास केला तेव्हा असं लक्षात आलं की, साहित्यिक म्हणून त्यांच्या राष्ट्रीय कार्याने एक प्रामाणिक साहित्यिक म्हणून त्यांच्या राष्ट्रीय साहित्यानं केवळ सोलापूर एवढं क्षेत्र न राहता पुर्ण भारतातून त्यांचं कार्य पाहता स्वातंत्र्य चळवळीत खूप मोठं योगदान त्यांनी दिले आहे.



प्रो. सुवर्णा गुंड-चव्हाण

लेखिका, सोलापूर

९८२२१३३३२६


स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे कार्य अनमोल आहे. त्यासाठी त्यांनी सोलापूर शहर व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, लोकांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय शिक्षणासाठी शाळा भरवल्या, सभा घेऊन जागृती केली. प्रभात फेऱ्या घेतल्या, गीतं लिहून सादर केली, टोपण नावाने जनजागृतीसाठी लेख लिहिले. ' भेटेन नऊ महिन्यांनी ' अशी क्रांतीची ज्योत पेटवणारी काव्यं लिहिले, काँगेस पक्षाच्या बैठकीत कुंजविहारींचं गीत म्हटलं जाई. ... मुळशीच्या प्रश्नासंदर्भात,' मुळशीचा पाळणा ' लिहला. अशी अनेक काव्यं अजरामर झाली. याच साहित्यिक कार्यामुळे त्यांना अटक झाली. महत्त्वाचे म्हणजे सोलापूरचे चार हुतात्मे हे त्यांच्या साहित्याच्या परिणामाचं मुर्तरुप आहे .कारण जेव्हा हुतात्म्यांना शिक्षा झाल्याचे समजते तेव्हा तिथंच तुरुंगात असलेल्या व भेटीला. गेलेल्या कुंजविहारींना अश्रू अनावर झाले तेव्हा हुतात्मा हुसेन त्यांना म्हणतात, आपनेही हमें शिकाया है । और आपके आंख में आसूं? शिक्षा झाल्यानंतर दहा दिवसांचा निशेधपर हरताळ तुरुंगात कैद्यांना पाळण्यासाठी कुंजविहारींनी जेलरकडे प्रयत्न केला व हरताळ पाळण्यात यशस्वी झाले !

कुंजविहारी म्हणजे गुरुनाथ हरीहर कुलकर्णी - सलगरकर यांनी स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय कविता जशा लिहल्या तसेच स्वराज्याचे सुराज्य व्हावे यासाठी उत्तरार्धात अनेक कविता लिहिल्या यामध्ये सोलापूरचे प्रश्न कसे सोडवायचे यांचाही विचार केला गेला आहे.याच , ' सोलापूर वर्णन ' सारख्या कवितांमधून दिसते. अशा या महान कवीच्या कवितेतून सोलापूरचा ख-या अर्थाने विकास झाला. साहित्यिक वैचारिक, राष्ट्रीय विचारांचं अधिष्ठान लाभले . अशा लोकहितकारक राष्ट्रीय कवींना व कार्याला आपण सोलापूरकर म्हणून स्मरण करतो का.... !

या अगोदर संत महंत यांनी लिहिलेल्या साहित्याचे योगदान सुद्धा मोलाचे आहे. सोलापूरच्या कार्यक्षेत्रात भागवत पंथाचे पंढरपूर हे तिर्थक्षेत्र आहे. यामध्ये अनेक संतांच्या उदयाने मुस्लिम आक्रमणास परतवून लावण्यासाठी, समाज संवर्धनासाठी सोलापूर परीक्षेत्रातील संतांचे सोलापूरच्या विकासातील योगदान अनमोल आहे... तसेच रामजोशी सारखे महान शाहीर , विचारवंत, साहित्यिक , नाट्य कलाकार यांनी सोलापूरचा नावलौकिक वाढवला, विकास साधला आहे.

सोलापूरच्या साहित्याच्या इतिहासात डोकावले की अभिमान वाटतो. आता प्रश्न उरतो सद्यस्थितीचा .. कोण काय साहित्यिक कार्य करतो यापेक्षा ते कार्य नेटकं सर्वांना उपयोगाचे आणि लोकहितकार कसे होईल यावर भर द्यायला हवा. त्यासाठी तेवढ्या प्रगल्भतेने प्रथम सोलापूरच्या समस्या शोधून घ्यायला हव्यात व त्यांच्या कारणांची मीमांसा करताना त्यावर हितकारक उपाय कसा साधता येईल हे साहित्यिकांनी पहायला हवे. फक्त ते कळून उपयुक्त ठरते असे वाटते परंतु त्यासाठी योग्य माध्यमातून योग्य लेखन केले पाहिजे.. कलाकृतीतून उपाययोजनात्मक अशा विषयांवर लेखन केले पाहिजे. केवळ लिहिता हात असून चालत नाही तर तसा विचार असणं, तसं वागणं फार महत्त्वाचे आहे.... एवढं केलं तरी खूप योगदान होईल.

साहित्य क्षेत्रातील लेखन प्रसारमाध्यमांमध्ये प्रभावीपणे करता येईल. इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या सहाय्याने तळागाळापर्यंत पोहोचवता येईल. अभ्यासक्रमांतून विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनवता येईल. लोक कलाकारांसाठी वैचारिकता , सृजनात्मकता निर्माण करून देता येईल. प्रत्येक साहित्यिक त्यांच्या कुवतीनुसार वाढत असतो त्याला कुणीही आडकाठी आणण्यासाठी अडथळा न करता त्याला त्याच्या कुवतीनुसार वाढू द्यावं .तो जेव्हा ख-या अर्थाने वाढतो तेव्हा तिथल्या परिसरात सकारात्मक विचार नक्की पेरेल. आपोआपच सोलापूरचा विकास साधला जाईल !






सोलापूर तरुण भारत
४१ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
सोलापूर तरुण भारत

शुभेच्छुक

ARIHANT
ENGLISH MEDIUM
SCHOOL
Play Group TO STD.10[TH]
www.arihantems.com




Address: Rebba Nagar, Near Hira Moti Tower, Vidi Gharkul, Hyderabad Road, Solapur. Office Mob. 8623088995

डॉ कोठेज गॅस्ट्रो लिव्हर केअर एंड जी आय एंडोस्कोपी सेंटर

Dr. Kothe's
Gastro Liver Care and GI Endoscopy Center

डॉ. सुर्यप्रकाश राजेश कोठे
एम.बी.बी.एस., एम डी., डी. एम. गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी
कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजीस्ट
हेपॅटोलॉजीस्ट व जी. आय, एन्डोस्कोपीस्ट पोट, लिव्हर व आतडी विकार तज्ञ

उपलब्ध सुविधा
- गॅस्ट्रोस्कोपी अन्ननतिका व जठरांवरील तपासणी व उपचार
- कोलोनोस्कोपी : मोठ्या आतडीच्या विकारांवरील तपासणी व उपचार
- इ.आर.सी.पी. : पित्ताशयातील खडे व स्वादुपिंडाच्या आजारांवरील तपासणी व उपचार
- पॅथॉलॉजी लॅबची सोय फार्मसी
- ब्रॉन्कोस्कोपी ची सुविधा उपलब्ध
- सोनोग्राफी आणि डिजिटल एक्स-रे उपलब्ध




Admission उपलब्ध सुविधा

119/1, Murarji Peth, Near Char Putala, Besides Hotel City Park, Park Chowk, Solapur - 413001.

119/1, मुरारजी पेठ, चार पुतळा समोर,
हॉटेल सिटी पार्क शेजारी, पार्क चौक, सोलापूर - 413001.
ओ.पी.डी. वेळ ११ ते २, सायंकाळी ५ ते ८ 0217-2627004

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास शुभेच्छा!

लोकमंगल बँक
लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर
॥ अखंड गतीतून सार्थकता ॥
मा. आ. सुभाष (बापू) देशमुख
अध्यक्ष तथा आमदार दक्षिण सोलापूर
प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन शाळेजवळ, सोलापूर.
फोन : (०२१७) २७३५५०१/०२

१२% व्याज परतावा कर्ज योजना
सर्व प्रकारच्या व्यवसायाकरिता बँकेकडून आर्थिक साहाय्य

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
अण्णासाहेब पाटील
आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर
आर्थिक विकास महामंडळ

कमाल कर्ज मर्यादा रक्कम
रू. १५ लाख

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय
वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित
उपकंपनी – शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम
वसंतराव नाईक
विमुक्त जाती व भटक्या जमाती
विकास महामंडळ (मर्यादित) अंतर्गत

सर्व प्रकारच्या अन्न प्रक्रिया व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध.
प्रधानमंत्री फुड प्रोसेसिंग योजने अंतर्गत
३५% पर्यंत सबसीडी

AAI पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांचे सक्षमीकरण
व्याज परतावा योजना
कमाल कर्ज मर्यादा रक्कम
रू. १५ लाख

आजच बँकेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

अरुल पेंट्स
व सॅनिटरी
अरुल UPVC मॉड्यूलर किचन व फर्निचर
- वॉटर व डस्ट प्रूफ
- नविन डिझाईन्स
- मजबूत फर्निचर
- वाळवी पासून सुरक्षित
अरुल एंटरप्रायझेस
77-2000-1144
पत्ता: गाळा नं- 2, चैतन्य शॉपिंग सेंटर, विजापूर रोड सोलापूर

तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
CHANDRARUP
LADIES WORLD
| सारीज
| इमिटेशन ज्वेलरी
शॉप नं. १ अष्टविनायक आर्केड, डी मार्ट समोर, जुळे सोलापूर Mo.9673482999











# इये सोलापूरचिये नगरी...

**दै. तरुण भारत च्या वर्धापन दिनानिमित्त निघणाऱ्या विशेष पुरवणी करता सोलापूर संबंधित लेख पाठवा असा निरोप मिळाल्यामुळे चित्तवृत्ती एकदम प्रफुल्लित झाल्या.मनात विचारांचे काहूर उठले.शब्दांची जुळवा जुळव सुरू झाली.. आणि लेखणी पुढे सरसावली....**

काय आहे आपल्या सोलापूरची खरी ओळख जनमानसात ? आता हा प्रश्न पाहिल्यावरती प्रथमतः खूप नकारार्थी विचार डोक्यात येतात. जसे की संबंधित धरणे दर पावसाळ्यात शंभरीचा आकडा ओलांडून १२०-१३०% पर्यंत तुडुंब भरून वाहतात. तरीही आपल्या गावामध्ये वर्षातील बारा ही महिने पाण्याचे दुर्भिक्ष्य.. मरणासन्न झालेली सार्वजनिक बस व्यवस्था. आणि पहावे तिकडे खड्ड्याळ रस्ते या तीन मुख्य बाबीं बरोबरच आणखी इतर काही गोष्टी आहेतच. तरी पण या सगळ्यांचा जास्ती बाऊ न करता सामान्य सोलापूरवासी त्यांच्याशी दोन हात करत का होईना सुखा समाधानाने जगतोय. सोलापूरच्या मातीत आणि सोलापूरच्या पाण्यातच काही विशेष गुण असावा.. त्यामुळेच येथील जनता मुळातूनच एवढी सहनशील झाली असावी असे मला वाटते..असो..

आपले सोलापूर हे भारतातील मुख्य अशा उत्तर-दक्षिण रेल्वे मार्गावर येत असल्यामुळे त्यास महत्त्व प्राप्त झाले आहे. येथील सोलापूर चादरी संपूर्ण महाराष्ट्रातच काय परंतु आजूबाजूच्या राज्यातही प्रसिद्ध आहेत. त्याच्या जोडीला विडी उत्पादनातही आमचे सोलापूर महाराष्ट्रात वरच्या क्रमांकावर आहे. ग्राम दैवत श्री सिद्धेश्वर स्वामी, पंढरीची विठू माऊली, आणि अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ यासारख्या महान विभूतींचा वरदहस्त आणि आशीर्वाद आपल्या केवळ सोलापूर शहरालाच नव्हे तर जिल्ह्याला लाभला आहे. याशिवाय येथील भुईकोट किल्ला, श्री सिद्धेश्वर मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, हुतात्मा बाग, इंद्रभुवन म्हणजेच संपूर्ण शहराचा कारभार पाहणारी महानगरपालिका इमारत, त्याला लागूनच असलेली शुभराय आर्ट गॅलरी आणि स्मृती उद्यान ही भेट देण्यासारखी ठिकाणे आहेत. अनेक कला प्रदर्शन आणि नाट्य प्रयोग यासाठी येथे हुतात्मा स्मृती मंदिर आहे. वर्षारंभीचा खूप मोठा उत्सव म्हणजेच आम्हा समस्त सोलापूरकरांना आनंदाची पर्वणी देणारी येथील प्रसिद्ध अशी सिद्धेश्वर यात्रा म्हणजेच गड्ड्याची जत्रा....

आपले सोलापूर हे महाराष्ट्रातील पाचवे मोठे शहर असून हे सोलापूर जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. ते पश्चिम महाराष्ट्र या विभागात येते. कापड गिरण्यांकरता हे शहर प्रसिद्ध होते. प्राचीन काळात या शहराला सोन्नलगी किंवा सोन्नलपूर म्हणून सुद्धा ओळखले जात असे.. आमच्या सोलापूरचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे या शहराने स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वीच नऊ मे ते अकरा मे १९३० या काळात तीन दिवसाचे स्वातंत्र्य उपभोगले. पण या स्वातंत्र्यसंग्रामासाठी मल्लप्पा धनशेट्टी, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन व किसन सारडा यांना १२ जानेवारी १९३१ रोजी ब्रिटिशांनी सोलापूर मध्ये फाशी दिली. तेव्हापासून या शहरास 'हुतात्म्यांचे शहर' म्हणून ओळखले जाऊ लागले.. आणि आज मितीस आपल्या सोलापूर शहराची लोकसंख्या ४३ लाखाच्या वर जाऊन पोहोचली आहे......

सध्या माझे वास्तव्य पुण्यात आहे.. मग माझे सोलापूरशी नाते काय? सांगतो. माझी जन्मभूमी पंढरपूर म्हणजे सोलापूर जिल्हा..माझी कर्मभूमी सोलापूर.. नोकरी.. मध्य रेल्वे सोलापूर विभाग ..४० वर्षाच्या वरती सेवाकाल. डिव्हिजनल सेफ्टी कौन्सिलर या पदावरून निवृत्त... बालपण सोलापूर. शिक्षण सोलापूर.. तीन चार वर्षाचा अपवाद वगळता रेल्वे नोकरीतील बाकी सर्वकाळ सोलापूरच्या आसपास. शेवटची २२ वर्षे सोलापुरातच.. (म्हणजे सन १९८९ ते सेवानिवृत्ती वर्ष २०११ पर्यंत).. यामुळे सोलापूर शहराशी माझी घट्ट नाळ जुळलेली आहे ती अशी...

आज या घटकेला जरी मी वयाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या उंबरठ्यावरती उभा असलो तरी ईश्वरी कृपेने स्मृती खूप चांगली असल्यामुळे १९५८ सालापासूनचे सोलापुरातील माझे बालपण, शालेय व महाविद्यालयीन जीवन, (येथील हलवाई गल्लीतील माऊली इलेक्ट्रिक कंपनी मधील पार्ट टाइम जॉब करत करत केलेले कॉलेज) या सर्व घटना मला बैजवार आठवतात. आता आपण थोडे भूतकाळातील सोलापुरात फिरू या...

माझ्या शालेय जीवनाची सुरुवात गणपती घाटावरील सरस्वती मंदिर या शाळेतून झाली. इलफंडी.. म्हणजे आत्ताची मॉन्टेसरी, पहिली, दुसरी तिथे झाल्यानंतर इयत्ता तिसरी ते सातवी पर्यंत मी डफरीन चौकातील न्यू प्रायमरी स्कूल या लोणकर गुरुजींच्या शाळेत शिकलो. सध्या तेथे आता पेट्रोल पंप झाला आहे. या शाळेतील इयत्ता सातवीच्या आमच्या वर्गशिक्षिका म्हणजे सौ शिंदे बाई या चौपाड मधील स्वतःच्या वाड्यात राहायच्या. गौरवर्णीय खानदानी भारदस्त व्यक्तिमत्व. शिकवणीला कंपल्सरी गेलेच पाहिजे. शिकवणीची फी शून्य पैसे...खरं वाटत नाही ना?. त्यात या आमच्या बाई सोलापुरातील चार हुतात्म्यांपैकी कै.जगन्नाथ शिंदे यांच्या नातसून होत्या .पुढे आठवीला नॉर्थकोट हायस्कूलमध्ये. तेथील गणाचारी, शेख, चिपळूणकर इत्यादी शिक्षक अतिशय तल्लीन होऊन शिकवायचे. इयत्ता नववी दहावी अकरावी ही तीन वर्षे पंढरपूर व श्रीरामपूर येथे गेली. व कॉलेजला परत सोलापूरला यावे लागले. यावेळी सोलापूर मध्ये खूपच चेंजेस झालेले होते.गजबजलेला मेकॅनिकी चौक. त्याच परिसरातील जवळ जवळ असलेली सहा सिनेमागृहे.. नुकतेच बांधलेले भागवत यांचे आलिशान उमा मंदिर (१९६४ साली बहुदा, संगम या चित्रपटाने यातील कलाकार राज कपूर आणि राजेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत या टॉकीजचे उद्घाटन झाले.) व तेथेच चित्रमंदिर, छाया, आणि कलामंदिर या चार टॉकीजच्या परिसरातून बाहेर पडल्या पडल्या उजव्या हातालाच भारत वॉच कंपनीच्या शेजारी मीना टॉकीज आणि पुढे थोड्या अंतरावर आशा टॉकीज.. दिवसातील बारा तास हा परिसर गजबजलेला असायचा. थेटर च्या बाहेर उभ्या असलेल्या आईस्क्रीम कुल्फीच्या गाड्या, गरम भजीच्या गाड्या, रगडा पॅटीसच्या गाड्या. थिएटर परिसरात तिकिटांसाठी प्रेक्षकांबरोबर काळाबाजार वाल्यांची पण जा ये असायची. गर्दी अनावर झाली की तिकिटासाठी ही थिएटरची रांग लावणारी मालकाची माणसे... हातातील काठीचा धाक दाखवून त्यांना शांततेने रांगेत उभे राहायला भाग पाडायची.शिवीगाळ ही तेवढीच चालायची.चुकून त्यावेळी आम्ही मॅटिनीला वगैरे मित्रांबरोबर आलो की हा तमाशा पाहून भीतीने भेदरून जायचो. राहायला त्यावेळी भैय्या चौकातील बुबणे चाळीत होतो. या परिसरात हातभट्टी दारू सर्रास रबरी ट्यूब मध्ये संडासच्या आसपास टाकलेली मिळायची. एक दोन तासात ती पंटर द्वारे इच्छित स्थळी रवाना व्हायची.. भैया चौक म्हणजे गिरणी कामगारांचा परिसर. या ठिकाणी चार कापड गिरण्या जवळ जवळच होत्या. त्या म्हणजे.. लक्ष्मी विष्णू मिल, जुनी मील, नरसिंग गिरजी मील आणि जाम मील.. गिरणी कामगारांचा परिसर असल्यामुळे येथे कामगारांशिवाय युनियनच्या पुढारी लोकांचा पण फार वावर असायचा.त्यातून भांडण वादावादी.सोडा वॉटरच्या बाटल्या फोडून मारामारी, हे सगळे प्रकार सर्रास चालायचे.. मग खाकी मध्ये घुसायची. काही तरी देवाण घेवाण होऊन लगेच मॅटर क्लोज व्हायचा.. सात तारखेला या कामगारांचे पगार व्हायचे. एन्ट्री गेटचा परिसर गरमागरम भजी बटाटेवडा यांच्या गाड्यांवरील घमघमाटाने दरवळून जायचा.त्या वेळचे झुंजार कामगार नेते (कै.) भीम रोणे यांचा थोडा बहुत परिचय इथेच झाला. कारण त्यांचाच मुलगा मधुकर रोणे हा माझ्या वर्गात होता. पुढे तो कबड्डीपटू म्हणून गाजला. लोकप्रिय कामगार नेते भीम रोणे हे पट्टीचे वक्ते. यांच्या भैय्या चौकातील सभा तुफान गाजायच्या. पुढे ते आमदार म्हणून विधानसभेत ही गेले. इकडे आमची कॉलर पण टाईट झाली.आपला माणूस ना.. पण त्याच्या थोडे आधी, एक झुंजार कामगार पुढारी.. मला वाटते, शंकरराव आठवले त्यांचे नाव असावे, त्यांचा भर दुपारी खून झाला. त्या परिसरात एक दिवस १४४ कलम लावले होते....

सोलापूरला लागूनच कर्नाटक आणि आंध्र प्रदेशची सीमा असल्यामुळे येथे कन्नड आणि तेलुगु लोक पण आपले आपले व्यवसाय सांभाळून गुण्यागोविंदाने नांदतात. सोलापुरातील पूर्व भागात म्हणजेच दाजी पेठ कोंतम चौक वगैरे भागात या लोकांनी आपल्या बँका आणि सहकारी सोसायट्या वगैरेची चांगली भर घातली आहे..राजकीय क्षेत्रात पण यांचा वावर आहे. सोलापूरच्या महापौर पदावर पण अनेकदा त्यांच्या पुढार्यांची वर्णी लागली आहे. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी त्या भागातील रस्तोरस्ती यांचे हॅण्डलूमवर काम चालायचे. आता त्याची जागा बंदिस्त यंत्रमाग कारखान्यांनी घेतली आहे. या चादर व्यवसायिकांनी सोलापूरचे नाव आता जागतिक नकाशा वरती नेले आहे.

नवी पेठ, मंगळवार पेठ, हलवाई गल्ली, सराफ कट्टा, पूर्व भाग, चाटी गल्ली, कुंभारवेस, आडत बाजार, ही त्यावेळी सोलापुरातील व्यापार उदीमाची ठिकाणे. किराणा भुसार, धनधान्य, सोने चांदी, कपड्यांची, साड्यांची, स्टेशनरी, तांबे पितळ लोखंड, औषधी वनस्पती इत्यादींच्या खरेदी विक्रीचे लाखो रुपयांचे व्यवहार त्याकाळी इथे व्हायचे.क्षुधा शांती म्हणजेच चहापाणी जेवणासाठी विविध प्रकारच्या शाकाहारी मांसाहारी खानावळी येथे भरपूर होत्या आणि आहेतच. पण त्याकाळी बोटावर मोजता येतील एवढीच हॉटेल्स उत्तम अथवा दर्जेदार या कॅटेगरीत यायची. मेकॅनिकी चौकातील गदग ग्रँड, भारत भुवन, जय भवानी, लकी रेस्टॉरंट, बाजूलाच कोमल विलास, थोडेसे पुढे गेल्यानंतर डफरीन चौकातील हॉटेल उपहार, त्याच्या पुढे हॉटेल कामत.. माणिक चौकातील उडपी आनंद भुवन.. येथेच फक्त लुसलुशीत बेंगलोर डोसा मिळायचा लोणी सह.. सकाळी आठ वाजल्यापासून बारा वाजेपर्यंत ही हॉटेल्स ग्राहकांनी ओसंडून गेलेली असायची.. रेल्वे स्टेशन एरियातील शिवानंद, हॉटेल कॅफे स्माईल, हॉटेल वेलकम, नॉनव्हेज खाण्यासाठी वडवान हॉटेल बेगम पेठे शेजारी, रेल्वे स्टेशन जवळील वाडिया हॉस्पिटलला लागूनच आरोग्य भुवन नावाचे छान हॉटेल होते..परंतु सध्या



वाडिया हॉस्पिटल

बंद असल्यामुळे ते हॉटेल पण बंद पडले.(पण कालच पेपर मध्ये बातमी वाचली की हे हॉस्पिटल पुन्हा नव्या जोमात सुरू झाले आहे. फार आनंद झाला.) मेकॅनिकल चौकातील भारत भुवन हॉटेलमध्ये मिळणारी गरमागरम पुरी भाजी सोलापूरकरांची फार आवडती. तर त्याच्या समोरील मीना टॉकीज शेजारी गदग ग्रँड मध्ये मिळणारा ओले खोबरे युक्त गरमागरम बटाटेवडा, तांबूस रंगाचा मसाला डोसा.. लोणी युक्त. नुसते पाहूनच तोंडाला पाणी सुटायचे. तसे सगळीकडे दर मात्र सामान्यांच्या आवाक्यात...







सोलापूरचे नाव जागतिक नकाशावर आणलेल्या काही तुरळक व्यक्तींमधे प्रामुख्याने घेतले जाणारे नाव म्हणजे सोलापूरच्या मातीत जन्मलेले डॉक्टर कोटणीस. आपत्कालीन काळामध्ये देशाच्या पंतप्रधानांच्या हाकेला प्रतिसाद देऊन चीनमध्ये जाऊन तेथे वैद्यकीय सेवा देऊन तेथेच देह ठेवला. त्यांच्या जीवनावर डॉक्टर कोटणीस की अमर कहानी या नावाचा चित्रपट ही निघाला. आणि वैद्यकीय क्षेत्रातील अजून एक दखल घेण्याजोगे नाव म्हणजे डॉक्टर वैशंपायन. सोलापूरच्या मेडिकल कॉलेजला यांचेच नाव दिले आहे. व्यापार व अन्य क्षेत्रात गेल्या सात आठ दशकांपासून प्रसिद्धीत असलेल्या काही राजकारणातील अथवा नामवंत घराण्यांमधील व्यक्तीमध्ये पुढाऱ्यांमध्ये.. वानगी दाखल काही उल्लेखनीय नावे म्हणजे प्रामुख्याने लिंगायत समाजातील वारद, बनशेट्टी शिवदारे,चाकोते, धनशेट्टी, म्हमाणे, काडादी, तर साळी समाजातील बोल्ली, बाळी, पुलगम, दिकोंडा, बुर्गुल, ब्राह्मण समाजातील आपटे सराफ, खाडीलकर सराफ... तर राजकीय पटलावर काँग्रेसचे सुशील कुमार शिंदे, सिद्धाराम म्हेत्रे, हिंदू महासभेचे माजी आमदार आणि हिंदू महासभेचे (कै.) वि.रा. पाटील, कम्युनिस्ट पक्षातील आडम मास्तर, भाजपमधील सुभाष देशमुख, विजय देशमुख. इत्यादी लोकांनी जनमानसावर आपला ठसा उमटविला. लेखाला असलेल्या शब्द मर्यादेमुळे मी येथे फक्त नमुन्या दाखल थोड्याच नावांचा उल्लेख केलाय...न्याय क्षेत्रामध्ये जुन्या पिढीतील प्रसिद्ध एडवोकेट फौजदारी खटल्यातील नामवंत नाव म्हणजे कै.एकनाथ तुळशीराम माने. उपाख्य ए.तु.माने वकील ..उंच सडपातळ शरीर यष्टी,अक्कडबाज पांढऱ्या मिशा. डोक्याला फेटा आणि नजरेत जरब.. डोळ्यास डोळा भिडला की भल्या भल्या आरोपींना घाम फुटायचा. मला या विद्वान साहेबांचा जुजुबी सहवास लाभला. म्हणजे ६८-६९ साली मी सोलापूर कॉलेजमध्ये फर्स्ट इयर कॉमर्सला असताना दुपारच्या फावल्या वेळात कोर्टात जाऊन त्यांच्या अशीलाची कोर्ट केसेस संबंधित कागदपत्रे लिहून द्यायचो. त्याचा मेहनताना मला मिळायचा. आज मितीला त्यांचे चिरंजीव नामवंत कायदे पंडित एडवोकेट मा.धनंजय माने हे त्यांचा हा वारसा सक्षमपणे पुढे चालवत आहेत. सोलापूर दै.तरुण भारत मधील माझ्या साठवणीतील आठवणी या दर शुक्रवारच्या पुरवणी मधील सदरामध्ये फेब्रुवारी २२ पासून मार्च २४ पर्यंत सलग प्रसिद्ध झालेल्या सुमारे ८६ लेखां मुळे आणि ते प्रचंड आवडल्यामुळे धनंजय माने साहेब मला व्हाट्सअप वर प्रत्येक आठवड्यात सुंदर अभिप्राय द्यायचे आणि भरभरून कौतुक करायचे. आता आत्मचरित्र लिहायला सुरुवात करा म्हणून प्रत्येक वेळी ते मला प्रेमाने 'अनिल राव' असा खास उल्लेख करून बजवायचे. खरंच दिलदार आणि फार मोठ्या मनाचे आहेत धनंजय सर .. दुसरे एक मा.उदय लळीत..हे ही सोलापूरचेच असून त्यांनी तर भारताचे ४९ वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती होण्यापर्यंत मजल मारली. नुकतेच ते सेवानिवृत्त झाले. म्हणूनच मला अभिमानाने असे म्हणावे वाटते की आमची सोलापूरची भूमी ही अशा नर रत्नांना जन्म देणारी सुपीक उपजावू भूमी आहे.सोशल मीडिया त्यावेळी आजच्या सारखा सशक्त नव्हता. सुरुवातीला एकच दैनिक सोलापूर समाचार नावाचे.. जक्कल बंधूंचे. त्यानंतर मला वाटते बहुदा १९६१ साली दैनिक संचार सुरू झाला.. काडादी आणि कै.रंगा वैद्य यांच्या अधिपत्याखाली. विश्व समाचार नावाचे अजून एक दैनिक मध्येच चालू झाले . पाठपुरावा करून करून सोलापूर आकाशवाणी केंद्र सुरू झाले..पण आजच्या घडीला आपल्या सोलापुरातून दै.संचार, दै.तरुण भारत, दै. पुण्यनगरी, दै. सुराज्य, दै.लोकमत आणि दै.दिव्य मराठी व दै. सकाळ ही दैनिक वर्तमानपत्रे प्रकाशित होतात.. ..

..तर हा झाला सोलापूर शहराचा मागील काळातील धांडोळा. आता आपण वर्तमानात म्हणजेच उघडा डोळे बघा नीट या स्थितीमध्ये येऊ..

आजच्या काळात कोणत्याही शहराचा योग्य तो विकास होण्यासाठी काही नॉर्मस् पाळणे आवश्यक असते. काय आहेत हे नॉर्मस.. तर प्रथम म्हणजे शिस्तबद्ध आणि स्वयंपूर्ण प्रशासकीय व्यवस्था.. नागरिकांतून निवडून आलेले अभ्यासू वृत्ती असलेले सचोटीचे नगरसेवक व यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी कायम सजग असलेला या शहराचा नागरिक. जो सदैव जागरूक मतदार देखील असायला हवा... परंतु दुर्दैवाने तसे आढळत नाही. आता यावर जास्त खोलात न जाता काय करायला पाहिजे याबद्दलच्या माझ्या माफक कल्पना मी खाली देत आहे.. भ्रष्टाचार खाबूगिरी परमिट राज यावरती कडक नियंत्रण हवेच. शासकीय पदावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांची गुणवत्ता निवडीची पूर्वापार प्रचलित असलेली पद्धती बदलून प्रखर देशप्रेमी, नीतीची चाड असणारे, आपल्या अकाउंटॅबिलिटीची सदैव जाणीव बाळगणारे .. अशाच व्यक्ती वरिष्ठ पदाकरता निवडल्या जाव्यात. सिलेक्शन हे टाईम बॉण्ड बेसिस वर केले जावे. वशिला, चिठ्ठ्या, भाई भतीजा वाद या गोष्टी पूर्ण तडीपार व्हाव्यात. नियोजन दीर्घकालीन हवे तात्पुरत्या बेसिसवर नसावे.वर्किंग परिसर हा कायमचा स्वच्छ, व बेसिक गरजा पूर्ण करणारा असावा.

सध्या सर्वसाधारण अशी परिस्थिती आहे की बहुतेक नगरसेवकांना शहरात उपलब्ध असलेल्या शासकीय योजनांची जेवढी हवी असावी तेवढी माहिती नसते. उदाहरणार्थ शहरातील पाण्याचा पुरवठा.. गरज किती, पाणी टाक्यांची वॉटर होल्डिंग कॅपॅसिटी आणि एकूण संख्या किती.. महापालिकेचे हद्दीतील पोलीस स्टेशन्स, शासकीय अन्नधान्याची स्वस्त मूल्यांची दुकाने किती आणि कुठे आहेत. सरकारी दवाखाने. अग्निशामन यंत्रणा, पालिकेची सिटी बस योजना. त्यातील त्रुटी, त्यावरचा उपाय, महापालिकेच्या अस्तित्वात असलेल्या आणि बंद पडलेल्या एकूण प्राथमिक शाळा,.. भूमिगत वॉटर पाईपलाईन याचे शासकीय नकाशे महापालिकेच्या दप्तरी असतात, त्याची कल्पना नगरसेवकाला असणे आवश्यक आहे. कारण आत्ताच्या बहुसंख्य नगरसेवकांना याची कल्पनाही नसावी. या ठिकाणी आज मला सुमारे पाच दशकापूर्वीच्या कै. विश्वनाथ बनशेट्टी या धुरंधर नगरसेवकाची, ज्यांनी पुढे महापौर पद ही भुषविले, त्यांची आठवण प्रकर्षाने येते.पालिकेतील विविध खात्यातील रेकॉर्ड बद्दलचा त्यांचा अभ्यास फार दांडगा होता. २४ ताशी पाण्याच्या नळाच्या सार्वजनिक सेवा शहरात किती ठिकाणी कोणत्या चौकात पुरविल्या आहेत ही माहिती त्यांना तोंडपाठ होती..जाऊ दे. ही यादी खूप लांबत जाईल. परंतु आपण निवडून दिलेला लोकसेवक या सगळ्या गोष्टी जाणून आहेत याची आपण खात्री करून घेतली पाहिजे. तरच शहराचा पाहिजे तसा विकास प्रशासनाला करता येईल.. शहरातील शांततेला बाधा येणाऱ्या गोष्टी नेस्तनाबूत करणे, उद्याने, वृक्ष संवर्धन, वेस्ट कलेक्शन आणि त्याची विल्हेवाट.. भटकी कुत्री, रस्त्यावर हिंडणारी बेवारसी जनावरे. असंख्य गोष्टी असतात. त्याचा सगळा ताळमेळ आणि कनेक्टिव्हिटी आणि जबाबदारी उत्तरदायित्व.. अशा गोष्टींचे योग्य ते समुपदेशन, माहितीगार व्यक्तीकडून वारंवार केले गेले पाहिजे..

पण मी येथे खात्रीपूर्वक म्हणू शकतो की सगळेच दिवे विझलेले नाहीत. सोलापुरातील उदयोन्मुख नवीन पिढी आधुनिक माहिती तंत्रज्ञान मध्ये हुशार आहे. डिजिटल युगाकडे धावणारी आहे. सोलापुरातील निरनिराळ्या शैक्षणिक संस्था, संगणक ज्ञान देणाऱ्या संस्था, भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत.. पण येथून उच्चशिक्षित होऊन बाहेर पडल्यानंतर रोजगारासाठी / नोकरीसाठी मुंबई पुण्याची किंवा परदेशाची वाट धरावी लागते. कारण आपल्या शहरात रोजगार उपलब्ध नाहीत. म्हणून युद्ध पतळीवर प्रयत्न करून सोलापूर मध्ये एका आयटी पार्कची निर्मिती झाली पाहिजे. म्हणजे सोलापूर सिटी ही भविष्यात पेन्शनरांचे शहर न राहता उत्साहपूर्ण तरुणाईचे आणि सुखी समाधानी आनंदी ज्येष्ठ नागरिकांचे गजबजलेले शहर अशी याची नवीन ओळख निर्माण होईल. असो..रस्ते रुंद आणि चकाचक होत आहेत. शहराचा नूरच बदलून टाकून आपले शहर सर्वांग सुंदर व्हावे या दृष्टिकोनातून शासकीय यंत्रणा पावले उचलत आहे. मोठमोठे मॉल्स, आलिशान हॉटेल्स, वातानुकूलित सांस्कृतिक केंद्रे, या शहराच्या वैभवात भर घालत आहेत. इव्हेंट मॅनेजमेंट कन्सेप्ट सोलापुरात रूढ होत आहे. मोठमोठी हॉस्पिटल्स शहरात झाली आहेत. सोलापूर हे हळूहळू आता शैक्षणिक हब आणि हॉस्पिटल हब म्हणून उदयास येत आहे. समन्वयाची फक्त जरूर आहे.. आम्ही सध्या पुण्यात असलो तरी आमची नाळ सोलापूरचीच आहे आणि सोलापूरीच राहील. साहित्यिक हालचाली ही भरपूर होत आहेत, नवनवीन कल्पना राबविल्या जात आहेत. निरनिराळे लेखक उदयास येत आहेत. प्रथितयश साहित्यिक मंडळी म्हणजेच माधव पवार, डॉ. श्रुती श्री.वडकबाळकर, डॉ शिवाजी शिंदे, प्रकाश जडे, वंदना कुलकर्णी, रेणुका बुधारम, राजेंद्र भोसले, मारुती कटकधोंड, संध्या धर्माधिकारी आदींच्या योग्य मार्गदर्शनाखाली सोलापुरातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखातून सदैव काहीतरी हालचाल चालू असलेली दैनिकातील नोटिफिकेशन वरून कळून येते. हे पाहिलं की मला अभिमान वाटतो. सोलापुरातील काही आवडीने खाल्ल्या जाणाऱ्या गोष्टींचा येथे जरूर उल्लेख करावासा वाटतो. त्या म्हणजे सोलापूरची पाणीपुरी, सोलापूरची कडक भाकरी, नसले बंधूंची शेंगा चटणी.. याची महती सोलापूरच्या बाहेर महाराष्ट्रभर झाली आहे. तसेच येथील सुधा इडली गृहाची ख्याती आता पुणे सांगली अशा शेजारच्या शहरा पर्यंत, इडली बरोबर केवळ विनाशुल्क अनलिमिटेड चटणी सांबर मिळते म्हणून झाली आहे... सोलापुरी चादरी आणि बेडशीट्स यांनी सोलापूरच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेरही भारतभर नाव कमावले आहे. राजकीय पातळीवर सुद्धा भाकरी पूर्ण फिरली आहे असे म्हणता येणार नाही. पण सध्या विधानसभेमध्ये आणि दिल्लीतील लोकसभेमध्ये आपल्या शहराचे प्रतिनिधित्व करणारी मान्यवर मंडळी म्हणजेच तडफदार प्रणिती शिंदे, प्रगल्भ सुभाष देशमुख, विजय देशमुख आणि त्यांचे कार्यकर्ते आदी आपापल्या परीने सोलापूर शहराच्या विकासासाठी धडपडत आहेत. सोलापूर -गोवा -सोलापूर विमान सेवा सुरू झाली आहे. उजनीची दुहेरी पाईपलाईन योजना पूर्णत्वास आली आहे. त्यामुळे नजिकच्या काळातच आपणा सोलापूरकरांचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल अशी अपेक्षा करूया.सोलापुरातील दोन्ही स्मशानभूमींच्या सुधारणे करता पावलं उचलली जात आहेत. आणि भारत की शान असलेली..सोलापूर पुणे वंदे भारत ट्रेन सुद्धा सुरू झाली आहे. म्हणजेच आता एकंदर कृष्ण मेघांच्या गर्दीत देखील सोलापूर शहरावर विकासाची सूर्य किरणे काळ्या ढगांना बाजूस सारून आम्हा तमाम सोलापूरकरांच्या डोळ्यास दिपवणारा सुखावणारा प्रकाश पाडण्याच्या तयारीत आहेत असे चित्र उभे करण्यास हरकत नाही. आता जरुरी आहे, अंतरबाह्य देशभक्त, देश प्रेमी, भ्रष्टाचाराची चीड असणार्या संवेदनशील आणि जागरूक प्रामाणिक जनतेची..

आपले सोलापूर सुंदर स्वच्छ आणि 'सुजलाम सुफलाम' करण्यासाठी, महाराष्ट्रात वरच्या स्तरावर आणण्यासाठी, त्यांनी खूप काही करायचं तर आहेच.. याशिवाय लक्षात ठेवावा आणि पूर्णपणे अंगीकारात आणावा असा आपल्या माननीय पंतप्रधानांचा मूलमंत्र.. काय आहे माहिती आहे ना. **तोच कायम लक्षात ठेवावा असा.. .. ना खाऊंगा. ना खाने दूंगा. जय हिंद.. जय महाराष्ट्र.**



अनिल पाटील
सोलापूर
८००७७१६३२१



दैनिक तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
प्रज्वालितोज्ञानमय:प्रदिप:
शतकोत्तर रौप्य महोत्सवी
श्री सरस्वती मंदिर संस्था संचलित
शतक महोत्सवी
सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशाला
लक्ष्मीबाई किर्लोस्कर प्राथमिक शाळा
जडाबाई रामसुख चंडक बालक मंदिर
१७५ गोल्डफिंच पेठ, गणपती घाटाजवळ, सोलापूर, ४१३००७
फोन 0217-2740140
इमेल : shn1935@gmail.com
वेबसाईट : https:/saraswatimandirsanstha.org/
- शुभेच्छुक -
सर्व विश्वस्त, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

तरुण भारतच्या ४१व्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
दशरथ श्रीमंत गुरव
जिल्हाध्यक्ष : सोलापूर शहर जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ
सचिव : सोलापूर जिल्हा क्रीडा मार्गदर्शिका शिक्षण

प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनांस मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा!
सरपंच — श्री. प्रमोद उर्फ कृष्णा पाटील
उपसरपंच — श्री. प्रमोद पाटील
ग्रामविकास अधिकारी — श्री. अनंत कुटे
शुभेच्छुक
सर्व सदस्य, कर्मचारी वृंद,
ग्राम पंचायत बारोळ, ता. दिवणी, जि.लातूर

सत्यमेव जयते या तत्वावर चालणारे यशस्वी दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रास ४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
सनी भोसले
क्रीडा शिक्षक
सेंट जोसेफ स्कूल,सोलापूर

सोलापूर तरुण भारत
४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
शहराध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, जेऊर — मा. अतुल निर्मळ
संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष — शिवश्री सुहास पोळ
मा.श्री. नितीनजी खटके साहेब
पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष, संभाजी ब्रिगेड
शिवराय-फुले-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्रासोबत आम्ही आहोत!
मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड
संभाजी ब्रिगेड, करमाळा तालुका

# आदर्श पब्लिक स्कूल, कुर्डूवाडीचे यश पाहून शिक्षण क्षेत्रात कौतुक

दैनिक तरूण भारत वर्धापनास हार्दिक शुभेच्छा!

## १) मागील आठ वर्षांत शेकडो विद्यार्थी पात्रच नाहीतर शिष्यवृत्तीधारक सुद्धा
## २) आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडीची शिष्यवृत्ती परीक्षेत यशाची परंपरा कायम

### पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा - २०२५




### पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा - २०२५




महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५ वी) व माध्यमिक (इ. ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, कुर्डूवाडी येथील आदर्श पब्लिक स्कूलने नेहमीप्रमाणेच याही वर्षी आपल्या यशाची परंपरा कायम राखत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २४- २५ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श पब्लिक स्कूलची काव्या देशमुख हिने राज्यात पाचवा येण्याचा मान मिळवला आहे तर २७ विद्यार्थी हे शिष्यवृत्तीधारक झाले असून ९० विद्यार्थी पात्र झाले आहेत काव्याने या राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय संपादन केले आहे . यामध्ये इयत्ता पाचवी मधून काव्या देशमुख २८६ वृंदा सोनवणे २५८ श्राव्या खुणे २५६ राजवीर गडेकर २५० श्रुती जगताप २४८ अनुश्री साळुंखे २४६ शिंदे २४४जैद मुलाणी २४२ सही माळवदकर २४० ईश्वरी डोंगरे २३८ विराज ढगे २३८ समर्थ शेजुळ २३० श्रवण मोरे २३० स्वप्नाज कदम २२६ देवांश छापेकर २२४ तनया शिंदे २२४ गौरी भोंग २२४ इयत्ता आठवी मधून राहीश शेरताटे २५४ पृथ्वी शिंदे २४६ रुद्रप्रताप महिंदळे २४४ पार्थ क्षीरसागर २१२ साक्षी काळे २०६ अक्षरा माने २०२ विक्रम शेळके १९२ शिवराज खंडागळे १९० उजमा तांबोळी १८८ कार्तिकी मोहिते १७८ याप्रकारे गुण विद्यार्थ्यांनी संपादन केले आहे परीक्षेत यश मिळवले असून या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या बुद्धिमत्तेचे नाही, तर त्यांच्या परिश्रम ाचे आणि सातत्याचे प्रतीक आहे.

या यशामुळे आदर्श पब्लिक स्कूलने शैक्षणिक गुणवत्तेचा उच्चांक गाठला आहे ही कामगिरी






शाळेसाठीच नव्हे तर संपूर्ण परिसरासाठी अभिम ानास्पद ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या अथक मेहनती सोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे योगदान या यशामागे ठळकपणे दिसून येत आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुनम बारबोले ,बालिका कोरके, अनिता थोरात, धनंजय चोपडे, पंडित जाधव गणेश ठवरे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.अमोल सुरवसे सर व प्रकल्प संचालिका सौ पूजा सुरवसे यांच्या कुशल नेतृत्वाखाली, अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले आहे. शाळेने नियमितपणे घेतलेल्या सराव परीक्षा, विशेष मार्गदर्शन वर्ग, आणि प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष दिल्यामुळेच हे यश शक्य झाले आहे तसेच पालकांच्या सक्रिय सहभागामुळे आणि विश्वासाने विद्यार्थ्यांच्या यशात मोलाची भर पडली.

शाळेच्या अभ्यास पद्धतीचा आणि म ार्गदर्शनाचा आदर्श नमुना म्हणजे यामध्ये शाळेची अभ्यास पद्धती, शिक्षकांचे मार्गदर्शन, नियमित सराव, विद्यार्थ्यांचे परिश्रम, आणि पालकांचे सहकार्य होय.या यशातून शाळेने शैक्षणिक क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले असून, भविष्यातही असेच यश संपादन करेल असा विश्वास माढा तालुका परिसरातून व्यक्त केला जात आहे.

अवघ्या दशकात स्थापन झालेल्या आदर्श पब्लिक स्कूल, कुर्डूवाडी ने इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेच्या उज्वल निकाला नंतर शिष्यवृत्ती परीक्षेतही माढा तालुक्यात सर्वाधिक यश मिळवून आपली शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.अमोल म ोहन सुरवसे यांनी स्थापन केल्यापासून निकालाच्या बाबतीत टॉपला आहेत.

या आठ वर्षांत २ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले आहेत तर १४० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. विद्यार्थी इयत्ता आठवीचे एकूण ३५ विद्यार्थी व इयत्ता आठवीचे एकूण १०५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. राज्य गुणवत्ता यादीत इयत्ता पाचवीतील राहीश शेरताटे राज्यात दुसरा व काव्या देशमुख ह राज्यात पाचव्या क्रमांकावर आली.या दोघांचे यश विशेष उल्लेखनीय ठरते.











# सोलापूर परिसरातील अहिल्यादेवींचे कार्य

**पुण्यश्लोक, रणरागिणी, महाराणी, राजमाता, श्रीमंत अशा अनेक उपाधीस पात्र असलेल्या अहिल्यादेवी होळकर यांनी होळकरांच्या गादीचा कारभार स्वतंत्रपणे सुमारे २८ वर्षे केला. ३१ मे १७२५ मध्ये चौंडी येथे जन्म झाल्यानंतर पुढे मल्हाररावांचे पुत्र खंडेराव यांच्याशी विवाह झाला. विवाहानंतर इंदौर येथील होळकरांच्या संस्थानात त्यांनी राज्य कारभारात लक्ष घातले. मराठा साम्राज्याचा विस्तार होत असतानाच सातारचे छत्रपती शाहू महाराज, पुण्याचे पेशवे, सासरे मल्हारराव, पती खंडेराव, सासू गौतमाबाई यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कारभार करणाऱ्या महाराणी म्हणून अहिल्यादेवींचा डंका हिंदुस्थानासह परदेशातही वाजत होता. मल्हाररावांच्या निधनानंतर होळकरांचे संस्थान गिळंकृत करण्याचा रघुनाथराव पेशव्यांचा डाव त्यांनी हाणून पाडला. सैन्यामध्ये महिलांची स्वतंत्र फौज निर्माण करून होळकरशाहीतील लष्कर मजबूत करण्याचा प्रयत्न केला. हिंदुस्थानभर पुण्यकर्माबरोबरच जनहिताची कामे करणाऱ्या आणि नीर क्षीर विवेक या पद्धतीने न्यायदान करणाऱ्या इंदौरच्या महाराणी अहिल्यादेवी हिंदुस्थानभर प्रसिद्ध होत्या. त्यांच्या कालावधीत युद्धे कमी झाली. परंतु प्रसंगी हातात तलवार घेऊन रणांगणातदेखील उतरून शत्रूचा नायनाट केला.**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या कार्याचा डंका संपूर्ण जगात आहे. संपूर्ण हिंदुस्थानात केलेली लोकोपयोगी कामे प्रेरणादायी आहेत. सोलापूर परिसरात चौंडी, चोराखळी, पंढरपूर, तुळजापूर, बोहाळी, माळशिरस, जेजुरी आदी परिसरात त्यांनी केलेल्या कार्याची माहिती मिळते.

**अहिल्यादेवींचे जन्मगाव चौंडी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी येथे झाला. सोलापूर-अहिल्यानगर महामार्गावर हे छोटेसे गाव असून सोलापूर ते करमाळा १२३ किलोमीटर अंतर असून आणि करमाळ्यापासून २७ किलोमीटर अंतरावर चापडगावपासून अगदी चार ते पाच किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. सीना नदीच्या काठावर चौंडी हे गाव असून अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज शिंदे परिवार आजही येथे राहतात. या गावात ऐतिहासिक जुना वाडा आणि मोठा किल्ला आहे. गावातच चौंडेश्वर, महादेव आणि अहिल्येश्वर अशी मंदिरे आहेत. सीना नदीच्या काठावर याच गावात घाट बांधण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारने अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची माहिती व्हावी यासाठी शिल्पसृष्टी बांधली असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक घेऊन अहिल्यादेवींच्या कार्याला उजाळा देण्याचा प्रयत्न केला आहे. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अहिल्यादेवींचे भव्य स्मारक करण्याचा निर्णय घेतला असून या कामासाठी सुमारे साडेपाचशे कोटी रुपये निधीही मंजूर करण्यात आला आहे.

**अहिल्यादेवींचे आजोळ चोराखळी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म चौंडी येथे झाला असून त्यांचे आजोळ हे चोराखळी(सोनाखळी) आहे. सोलापूर-धुळे महामार्गावरील येडशीजवळ हे छोटे गाव असून सोलापूर ते येडशी ८५ किमी असून येडशी ते चोराखळी हे अंतर सात किलोमीटर आहे. धाराशिव जिल्ह्यातील हे गाव असून या गावात अहिल्यादेवींच्या आजोळच्या वंशातील मैंदाड-पाटील परिवारातील लोक आजही राहतात. चोराखळी या गावात अहिल्यादेवींच्या आईची आई म्हणजे आजी कृष्णाबाई बाळाजी मैंदाड-पाटील यांची समाधी आहे. समाधीजवळच पौराणिक मंदिर आहे. या मंदिराजवळच विहीरदेखील आहे. चोराखळी गावापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर ऐतिहासिक पापनाश मंदिर आहे. हा परिसर डोंगर आणि दंडकारण्याचा असून श्रीराम चा पदस्पर्श या डोंगर परिसरात झाला असल्याचे सांगितले जाते. मंदिराजवळच बोधले महाराजांची समाधी आहे. तसेच पापनाश मंदिराजवळ महादेव पिंडीच्या आकाराची टेकडीदेखील




दिसून येते. याच परिसरात तत्कालीन खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्या खासदार निधीतून ६० लाख रुपये खर्चून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुद्देशीय सभागृह बांधण्यात आले आहे. या गावाच्या विविध विकासासाठी अहिल्यादेवींनी त्यांच्या कार्यकाळात निधी दिला आहे.

**पंढरपूरचा ऐतिहासिक होळकरवाडा :** पंढरपूरचा विठोबा म्हणजे अखख्या महाराष्ट्राचे दैवत. अहिल्यादेवी होळकर यांनी पंढरीला येणाऱ्या वारकऱ्यांची राहण्याची सोय व्हावी यासाठी विठ्ठल मंदिरासमोर आणि चंद्रभागा नदीच्या काठावर सुमारे दोन एकर जागेवर भव्य असा ऐतिहासिक होळकरवाडा बांधला आहे. सोलापूर ते पंढरपूर हे ७२ किलोमीटर अंतर असून चंद्रभागा नदीच्या काठावर असलेल्या या होळकरवाड्याला पाहण्यासाठी पर्यटक येतात. हा होळकरवाडा १७६७ मध्ये अहिल्यादेवींनी बांधला असून या वाड्याच्या बांधकामासाठी मध्यप्रदेशातील जंगलातून लाकूड आणण्यात आले होते. तसेच बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी वाड्यावरुन हत्ती फिरवण्यात आले होते. याच मंदिरात श्रीरामाचे सुंदर मंदिर असून श्रीरामासह श्री लक्ष्मण आणि सीतेचीही मूर्ती आहे. या वाड्यात श्री हनुमानाचेदेखील छोटे मंदिर आहे. वाड्यात एकूण २५ खोल्या असून सभागृहदेखील आहे. अहिल्यादेवींचा कोरीव पुतळा देखील या वाड्यात बसविण्यात आला आहे. पंढरपूरच्या या होळकरवाड्याचे व्यवस्थापक म्हणून माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर हे काम पहात आहेत. अहिल्यादेवींनी श्री विठ्ठलासाठी दागदागिने अर्पण केले. असे सांगितले जाते. पंढरपुरात गावच्या दक्षिणेला तुळसीबाग अहिल्यादेवींनी सुरु केली होती. तसेच नामदेव पायरीजवळ घाटही बांधला आहे.



उज्वलकुमार माने
सोलापूर
९९२२४२४६१९

**पिण्याच्या पाण्यासाठी बोहाळीत विहीर :** पंढरपूर-कराड रस्त्यावर जाताना डावीकडे बोहाळी हे छोटे गाव आहे. या गावात अहिल्यादेवी यांनी त्यांच्या कारकिर्दीत पिण्याच्या पाण्यासाठी विहीर बांधली आहे. आजही या विहिरीला मुबलक पाणी असून लोक या विहिरीचे पाणी पितात. बोहाळी परिसरातच पशूपक्ष्यांच्या चारापाण्याची सोय व्हावी यासाठी अहिल्यादेवींनी जमीन खरेदी केली. या जमिनीत पिके उत्पादित करुन पशूपक्ष्यांसाठी राखीव ठेवण्यात येत असे. पंढरपूर ते बोहाळी हे २१ किमी अंतर असून खासगी वाहनाने या गावाकडे जाता येते.


**माळशिरसजवळ पालखी मार्गावर दोन विहिरी :** पंढरपूर-नातेपुते या पालखी मार्गावर वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी अहिल्यादेवींनी दोन विहिरी खोदल्या आहेत. पंढरपूरपासून नातेपुते मार्गावर सुमारे १५ किलोमीटरवर असलेल्या वाखरीजवळ विहिर बांधली असून या विहिरीला बाजीराव विहिर असे म्हटले जाते. दुसरी विहिर पंढरपूरपासून सुमारे ३५ किलोमीटर अंतराव खुडूसजवळ आहे. दोन्ही विहिरी महादेव पिंडीच्या आकाराच्या असून आजही या विहिरींना मुबलक पाणी आहे.

**तुळजापुरात विहिर आणि खोल्यांचे बांधकाम :** तुळजापुरात येणाऱ्या भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी विहिर बांधली आहे. संपूर्ण बांधकाम हे दगडी बांधकाम असून पाणी उपसण्यासाठी दगडी मोटही तयार करण्यात आली होती. तुळजाभवानी मंदिरसमोर धाराशिव रस्त्यावर आजही ही विहिर असून या विहिरीची पडझड झाली आहे. तुळजाभवानी मंदिरात गायमुखजवळ अहिल्यादेवी यांनी खोली बांधली. महिलांना कपडे बदलता यावेत यासाठी ही सोय करण्यात आली होती.

**जेजुरीत भव्य तलावाची निर्मिती :** पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात असलेल्या जेजुरी या गावी अहिल्यादेवी होळकर यांनी १७७० मध्ये सुमारे १८ एकर क्षेत्रात पाण्याचा भव्य तलाव खोदला आहे. जेजुरीचा खंडेराया म्हणजे होळकरांचे कुलदैवत. त्यामुळे अहिल्यादेवींची विशेष श्रध्दा होती. जेजुरी परिसरात असलेल्या डोंगरावरील अनेक झऱ्यांचे पाणी शुध्द होऊन शिस्तबध्द पध्दतीने या तलावात सोडण्यात आले आहे. तलावाचे पाणी पिण्यासाठी आणि शेतीसाठी वापरता यावे यासाठी उत्तम नियोजन करण्यात आले आहे. तलावाच्या बाजूला पाणी उपसण्यासाठी दगडी मोट आजही आहे. या तलावाच्याच बाजूला चिंचेचे बन आणि होळकरवाडादेखील आहे. तलावाच्या भिंतीवर महाराजा होळकर इंदौर स्टेटचा संगमरवरी बोर्डदेखील पहायला मिळतो. हा चौकोनी आकाराचा तलाव असून संपूर्ण बांधकाम दगडाचे आहे. तलावाच्या बाजूला दोन विहिरीदेखील बांधण्यात आल्या आहेत.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची माहिती सर्वत्र व्हावी यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येत असून महाराष्ट्र सरकारने ५ मार्च २०१९ रोजी सोलापूरच्या विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ असे नाव देण्याचा निर्णय घेतला. या विद्यापीठात अहिल्यादेवींच्या नावाने अध्यासन केंद्र असून अहिल्यादेवींच्या जीवनचरित्रावर असलेले साहित्य, शिल्प आणि इतर माहिती उपलब्ध आहे. विद्यापीठात अहिल्यादेवींचे स्मारक बांधण्यात येत असून पूर्णाकृती पुतळादेखील उभारण्यात आला आहे. डॉ. प्रकाश महानवर हे विद्यापीठाचे कुलगुरु असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर हे आहेत. या विद्यापीठाच्या परिसरात आल्यानंतर अहिल्यादेवींच्या कार्याची ओळख दिसून येते.








सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा.



ॲड. आल्हाद अंदोरे
9823220099



ॲड. अरविंद अंदोरे
9765988844



ॲड. अथर्व अंदोरे
8055888844

शुभेच्छुक

## अंदोरे परिवार

---

## विहान क्रिकेट अकॅडमी

इंदिरा गांधी पार्क स्टेडियम, सोलापूर

प्रशिक्षक



योगेश कोंपल

४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

\- प्रशिक्षणाची वेळ -

सकाळी ७ ते ९ सायंकाळी ४ ते ६

संपर्क : ९५११८३३९८७

---



* शुभेच्छुक *

दीपक शिंदे

जिल्हा सचिव

सोलापूर शहर व जिल्हा तलवारबाजी (फेन्सिंग) असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य व खेळाडूंच्या वतीने



४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

---



४१व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

सोलापूर शहर व जिल्हा हॅंडबॉल असोसिएशन व अजिंक्यतारा स्पोर्ट्स फाउंडेशन

सर्व पदाधिकारी, सदस्य व खेळाडू

---

सोलापूर तरुण भारत

वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



\- शुभेच्छुक -

## कल्याण करजगी, सोलापूर

---

स्थापना: २००४

शासनमान्य

माध्यम : सेमी इंग्रजी

WE SHPE THE BRIGHT FUTURE

ज्ञान, विज्ञान, सुसंस्कारासाठी शिक्षण प्रसार

जनसेवा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, कुडुवाडी संचलित

दैनिक तरूण भारत वर्धापन दिन शुभेच्छा

## जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर, कुर्डुवाडी

Email: jsvk44@yahoo.com Website: www.jivhalaschoolkurduwadi.com. YouTube: Jivhala Susanskar Vidyamandir, Kurduwadi

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश देणे सुरु आहे.**

- प्रवेश वर्ग: पूर्व प्राथमिक, खेळ गट
- बालवाडी छोटा गट, मोठा गट
- प्राथमिक इ. १ ली ते ५ वी
- उच्च प्राथमिक इ. ६ वी ते ८ वी
- माध्यमिक इ. ९ वी ते १० वी



मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा तालुकास्तरीय तृत्तीय क्रमांक

**विद्यालयाची वैशिष्ट्ये:**

सुसज्ज भव्य इमारत, मर्यादित प्रवेश, वैयक्तिक लक्ष, कायमस्वरुपी नियुक्त गुणवत्ताधारक शिक्षक, सर्व स्पर्धा परीक्षांचे आयोजन, सीसीटीव्हीयुक्त शालेय परिसर पाल्यांच्या प्रति पालकांच्या अपेक्षा पूर्ण करणारी शाळा

‘जिव्हाळा’त प्रवेश घ्या. मुलांच्या उज्वल भविष्याची हमी मिळवा...!

**विद्यालयाची वैशिष्ट्ये:**

Cognitive Exchange उपक्रमाद्वारे अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथील विद्यार्थ्यांद्वारे video Conference द्वारे इंग्रजीतून व्यक्तिमत्व घडविणारी शाळा. १४ वर्षे व १७ वर्षे वयोगटात तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत माढा तालुक्यात प्रथम क्रमांक. सलग ५ वर्षे खो-खो स्पर्धेत अजिंक्य, थोर शास्त्रज्ञांच्या भेटीद्वारे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणारी शाळा. मुलींसाठी सुरक्षित वातावरण असणारी शाळा.

सचिव



मा.श्री. अजित वायचळ

संस्थापक अध्यक्ष



मा.श्री. शिवराज वायचळ

मुख्याध्यापिका



मा. श्रीमती सारिका गोटे

‘जिव्हाळा’त प्रवेश घ्या आणि पाल्याच्या भविष्यासाठी निश्चिंत राहा...!

संपर्क : **जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर**

टेंभुर्णी रोड, कुर्डुवाडी. मो. : 9850610866, 9890794815

---

तरुण भारत

वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

मुख्यमंत्री स्वच्छ शाळा, सुंदर शाळा तालुका प्रथम क्रमांक प्राप्त शाळा

शुभेच्छुक

- चंद्रकांत बिराजदार — अध्यक्ष
- रुपाली म्हेत्रे — उपाध्यक्षा
- दत्तात्रय पोतदार — मुख्याध्यापक

शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य विद्यार्थी व शिक्षकवृंद

## जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा

सलगर, ता. अक्कलकोट